रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३३४
www.ramprahar.com

शनिवार, २१ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

बोलबच्चन भैरवी असलेल्यांना उत्तर देत नाही -मुख्यमंत्री/२
महाडमध्ये एनडीआरएफकडून आपत्कालीन बचाव प्रशिक्षण/५
राष्ट्रीय वुशू स्पर्धेत ऋषिकेश मालोरेला सुवर्णपदक/८

## इंग्लंडविरुद्ध कसोटीत यशस्वी जयस्वालचे शतक



**लीड्स** : इंग्लंडविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताचा युवा सलामीवीर यशस्वी जैस्वालने शानदार शतक ठोकले. हे त्याच्या क्रिकेट कारकीर्दीतील पाचवे शतक आहे. हा सामना लीड्सच्या हेडिंग्ले मैदानावर खेळला जात असून शुबमन गिल भारतीय संघाचे नेतृत्व करत आहे. भारतीय संघात अनेक युवा खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे भारताचा संघ फलंदाजीसाठी मैदानात उतरला. कसोटीच्या पहिल्या डावात यशस्वी जैस्वालने आपला समजूतदारपणा आणि तांत्रिक फलंदाजीने संघाला चांगली सुरुवात करून दिली. त्याने १६ चौकार आणि एक षटकाराच्या मदतीने शतकी खेळी केली. तो १०१ धावा करून बाद झाला. याशिवाय कर्णधार गिलही अर्धशतक ठोकून मैदानावर होता.

# जागतिक योग दिनानिमित्त आज ठिकठिकाणी उपक्रम

## प्रबळगड माची येथे 'योग विथ आमदार प्रशांत ठाकूर'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलच्या वतीने यंदाही जागतिक योग दिनाचे औचित्य साधून योग विथ आमदार प्रशांत ठाकूर या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत पनवेलजवळील प्रबळगड माची या निसर्गरम्य आणि ऐतिहासिक स्थळी शनिवारी (दि. २१) सकाळी ६ वाजता योगसाधना केली जाणार आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही योगप्रेमींना एकत्र आणून शारीरिक व मानसिक स्वास्थ्याचा संदेश देण्यासाठी उपक्रम राबवला जात आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने सुरू झालेला हा उपक्रम आता एक परंपरा बनला असून आरोग्य, युवक सशक्तीकरण आणि सांस्कृतिक जतन यांना वाहिलेला आहे. प्रबळगड माची हे सह्याद्रीच्या कुशीत वसलेले, निसर्गाच्या सान्निध्यातील एक शांत आणि ऊर्जादायी ठिकाण आहे. येथे योगाभ्यास करताना शरीर आणि मनाला नवचैतन्य मिळते. ऐतिहासिक ठिकाणी योगसाधना करताना निसर्गाशी नाते जपण्याची आणि आत्मिक शांतता अनुभवण्याची संधी मिळते.

या उपक्रमात दरवर्षी शेकडो युवक, महिला, स्थानिक नागरिक तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी सहभागी होत असतात. विविध योगासने, श्वसन तंत्रे आणि ध्यानधारणा यांचे सत्र या वेळी योजित करण्यात आले असून कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे स्वतः आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती आणि सहभाग आहे, जे सदैव युवावर्गासाठी प्रेरणास्त्रोत राहिले आहेत.




## उरण जेएनपीए येथे योग संगम कार्यक्रम

**उरण : रामप्रहर वृत्त**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयुष मंत्रालयाच्या वतीने महाराष्ट्रासाठी नोडल समन्वयक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या आरआरएपी (केंद्रीय आयुर्वेद अनुसंधान संस्थान, वरळी, मुंबई) तर्फे योग संगम हा मुख्य कार्यक्रम शनिवारी (दि. २१) पहाटे ५.३० वाजता जेएनपीए टाऊनशिप, सीआयएसएफ कॅम्पस, उरण येथे सुरू होणार आहे.

जेएनपीए तसेच केंद्र सरकारच्या बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाच्या सहकार्याने याचे आयोजन करण्यात येत आहे. या भव्य कार्यक्रमात सुमारे १० हजार योगप्रेमी सहभागी होण्याची शक्यता असून आयुष मंत्रालयाचे महासंचालक प्रो. रवीनारायण आचार्य यांची उपस्थिती असणार आहे, अशी माहिती केंद्रीय आयुर्वेद अनुसंधान संस्थेचे प्रभारी सहायक संचालक डॉ. आर. गोविंद रेड्डी यांनी दिली.

योग दिनानिमित्त आयोजित होणारा हा उपक्रम आरोग्यप्रद जीवनशैलीचा संदेश देणारा ठरणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेमार्फत करण्यात आले आहे. कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या नागरिकांना टी-शर्ट, रेनकोट, योगा मॅट मोफत वितरित करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे अल्पोपाहाराचीही सोय आहे.

आरआरएपी संस्थेने या संपूर्ण उपक्रमाचे समन्वयन करत योगाची व्यापक घडी घातली असून योग संगम हा केवळ एक कार्यक्रम नाही, तर निरोगी भारताच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल आहे, असे मत डॉ. रेड्डी यांनी व्यक्त केले.

# खारघरमध्ये दारूबंदीसाठी आंदोलन

## खारघरवासीयांच्या गळ्याचा घोट घेणारे वाईन शॉप चालू देणार नाही -आमदार प्रशांत ठाकूर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरवासीयांच्या गळ्याचा घोट घेणारे वाईन शॉप चालू देणार नाही तसेच येत्या अधिवेशनामध्ये या विषयी आवाज उठवेन, अशी आक्रमक भूमिका आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. २०) खारघरमध्ये दारूबंदीसाठी पुकारण्यात आलेल्या आंदोलनात मांडली.




खारघर सेक्टर ६ येथील शहा आर्केड सोसायटीची कोणतीही अधिकृत परवानगी नसताना गोल्डन कॉइन वाइन मार्ट हे दारूविक्रीचे दुकान सुरू करण्यात आले आहे. या विरोधात संघर्ष संस्थेच्या माध्यमातून आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी आंदोलन छेडण्यात आले. या आंदोलनात खारघरवासीय आणि सर्वपक्षीय नेते मोठ्या संख्येने सहभागी झाले. या आंदोलनामुळे गोल्डन कॉइन वाइन मार्ट तसेच जेजेस रसोई या रेस्टॉरंट अ‍ॅण्ड बारने बांधलेले अनधिकृत बांधकाम पनवेल महापालिकेच्या माध्यमातून पाडण्यात आले.

खारघर हा शैक्षणिक, सांस्कृतिक आणि वैचारिकदृष्टया विकसित होत असलेला परिसर आहे. येथील नागरिकांनी अनेक वेळा खारघरला दारूमुक्त झोन घोषित करण्याची मागणी केली आहे. रहिवासी आणि सामाजिक संस्थांचा विरोध असतानाही वाईन शॉप सुरू केले गेले आहे. खारघर संघर्ष समिती, लोकप्रतिनिधी आणि रहिवासी संघटनांकडून शासन दरबारी सातत्याने दारूबंदीबाबत पाठपुरावा सुरू आहे, मात्र १४ जूनला शहा आर्केडमध्ये वाईन शॉप सुरू झाल्याने परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. संतप्त नागरिकांनी तीव्र निषेध करत वाईन शॉप त्वरित बंद करण्यात यावा आणि खारघरला कायमचा दारूमुक्त झोन घोषित करावे, अशी मागणी केली. **(पान २ वर..)**

## नाफेड शेतकऱ्यांकडून शेतमाल थेट खरेदी करेल

### केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांची माहिती



**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रीय कृषी विपणन सहकारी संस्था (नाफेड) शेतकऱ्यांकडून लवकरच शेतमाल थेट खरेदी करेल. प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था २४ प्रकारचे व्यवसाय करू शकतील. दहा वर्षात कृषी निर्यात, सेंद्रिय अन्न आणि दूध या क्षेत्रात अमूल, कृभको आणि नाफेड या महाकाय संस्था होतील तसेच सहकार क्षेत्राची विमा कंपनीही स्थापन करू, असा सहकारामार्फत ग्रामीण भारताच्या समृद्धीचा आराखडा केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी (दि. २०) मांडला.

नाफेडतर्फे आयोजित 'सहकार से समृद्धी या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादात ना. शाह बोलत होते. व्यासपीठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे उपस्थित होते.

जर शेतकऱ्यांनी आपल्या शेतमालाच्या विक्रीसाठी नाफेडकडे नोंद केली तर तो शेतमाल नाफेड एमएसपीने खरेदी करेल आणि बाजारभाव जास्त असेल तर शेतकरी बाजारात माल थेट विकू शकतील, अशी योजना असल्याचे ना. शाह म्हणाले.

लवकरच देशात दोन लाख नव्या पतसंस्था निर्माण झाल्यावर देशातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये असतील. त्यानंतर या संस्था, जन औषध केंद्र, पेट्रोल पंप, गॅस वितरण, नळ योजनांची देखभाल, गोदामे, सहकारी टॅक्सी, विमान-रेल्वेचे बुकिंग आदी २४ कामे करू शकतील. तेथून जन्म-मृत्यू प्रमाणपत्रही मिळतील. याचबरोबर मच्छीमारांना खोल समुद्रात जाण्यासाठी मोठे ट्रॉलर देत असून दूध उत्पादकांनाही सहाय्य करत आहोत. मक्यापासून इथेनॉल तयार करून ते पेट्रोलमध्ये २० टक्क्यांपर्यंत मिसळण्यास परवानगी दिली आहे, अशी माहिती ना. शाह यांनी दिली.

### 'पतसंस्थांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी'

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, सहकाराच्या वेगवेगळ्या योजना देशात सुरू असल्यामुळे सहकाराचे वेगळे स्वरूप महाराष्ट्रात दिसत आहे. किंबहुना केंद्राच्या ठरवलेल्या लक्ष्यापेक्षाही जास्त काम महाराष्ट्रात केले आहे. यामुळे शेतकऱ्यांना बाजारपेठ आणि रोजगार मिळाला आहे, तर पतसंस्थांमुळे गावागावात ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बळकटी मिळत असून यापुढेही सहकार मानकांमध्ये महाराष्ट्र देशात अग्रभागी राहील, अशी हमी दिली.

## पेणमधील बेणसे येथे शेततळ्यात तिघे बुडाले

**पाली : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील बेणसे सिद्धार्थ नगर येथील गावाजवळ असणाऱ्या एका शेततळ्यात पोहण्यासाठी गेलेले तीन तरुण बुडाल्याची घटना शुक्रवारी (दि.२०) घडली. बुडालेल्या तरुणांमध्ये जोहेब जाकीर अत्तार (वय १७), मिझान जाकीर अत्तार (वय १४) आणि अश्फाक अली (वय १६) यांचा समावेश आहे.

तरुण बुडाल्याची खबर वाऱ्यासारखी पसरली आणि त्यांना वाचविण्यासाठी तातडीने गावातील लोक शेत तलावावर पोहचले. मोठ्या शर्तीने त्यांना बाहेर काढून रिलायन्स कंपनीच्या नागोठणे फॅमिली वेल्फेअर सेंटरमध्ये आणण्यात आले. तेथील डॉक्टर व स्टाफने प्राथमिक उपचार दिले आणि पुढील उपचारासाठी संजीवनी हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात आले.

घटनेची खबर मिळताच पेण तहसीलदार तानाजी शेजाळ व नागोठणे पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी रुग्णालयात दाखल झाले. या वेळी नातेवाईकांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली होती.

## मोहोपाड्यात शासकीय दाखले वाटप शिबिर

### आमदार महेश बालदी यांच्या हस्ते वितरण

**मोहोपाडा, चौक : प्रतिनिधी**

भाजप वासांबे जिल्हा परिषद विभागाच्या वतीने शुक्रवारी (दि. २०) मोहोपाडा येथे शासकीय दाखले वाटप शिबिर आयोजित करण्यात आले होते. अनेक जणांनी या शिबिराचा लाभ घेतला. त्यांना आमदार महेश बालदी यांच्या हस्ते दाखले देण्यात आले.



मोहपाडा साई मंदिर येथील सभागृहात झालेल्या या शिबिरास भाजपचे खालापूर तालुकाध्यक्ष प्रवीण मोरे, माजी जि.प. सदस्य मोतीराम ठोंबरे, कृष्णाशेठ पारंगे, विनोदशेठ भोईर, सरपंच उमा मुंढे, सरपंच प्रतिप पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, तहसीलदार अभय चव्हाण साहेब, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, गटविकास अधिकारी संदीप कराड, पोलीस निरीक्षक संजय बांगर, मंडळ अधिकारी श्रीनिवास खेडकर तसेच प्रवीण काळबागे, प्रवीण जांभळे, सचिन तांडेल, भूषण पारंगे, श्याम म्हसकर, आकाश जुईकर, चेतन जाधव, राकेश खारकर, स्वप्नील राऊत, जयदत्त भोईर, दीपक कांबळे, स्वप्नील जोशी, बाळाराम जांभळे, प्रमोद जांभळे, अनिल कुरंगळे, सागर सुखदरे, विशाल मुंढे, अमित शहा, मनोज सोमानी, रूपेश प्रबळकर, संदीप म्हात्रे, उमाकांत भोईर, ज्ञानेश्वर जांभळे, संतोष पटेल, स्वप्नील मांडे यांच्यासह नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## पनवेल ते पंढरपूर सायकल वारी

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सायकल चालवा, पर्यावरण वाचवा हा संदेश देत तसेच शरीरस्वास्थ्यासह आध्यात्मिक वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी पनवेल रायडर्स यांच्या वतीने पनवेल ते पंढरपूर सायकल वारीचे आयोजन करण्यात आले आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या विशेष सहकार्याने आयोजित या वारीला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली.



सायकल वारीचा शुभारंभ लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते भगवा झेंडा फडकावून झाला. या वेळी त्यांनी या अनोख्या उपक्रमात सहभागी सर्व सायकलस्वारांचे अभिनंदन केले तसेच आपल्या आरोग्याची काळजी घेऊन सुरक्षितपणे प्रवास करा, अशा शुभेच्छा दिल्या.

२० ते २२ जून अशी तीन दिवसांत ही वारी पूर्ण होणार असून या उपक्रमामुळे पर्यावरण संरक्षणाचा संदेश अधिक प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहचणार आहे. वारीच्या शुभारंभावेळी माजी नगरसेवक गणेश कडू यांच्यासह पनवेल रायडर्सचे सदस्य उपस्थित होते.





# बोलबच्चन भैरवी असलेल्यांना उत्तर देत नाही -सीएम फडणवीस

**जळगाव : वृत्त संस्था**

शिवसेनाप्रमुखांचा ब्रँड पुसून टाकण्याचा प्रयत्न केल्यास भाजपचे नामोनिशाण महाराष्ट्रातून मिटवून टाकू, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी गुरूवारी मुंबईत पार पडलेल्या पक्षाच्या मेळाव्यात दिला होता. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही बोलबच्चन भैरवींना मी उत्तर देत नाही, अशी टीका ठाकरे यांचे नाव न घेता केली.

कम ऑन किल मी हिंमत असेल तर अंगावर यापण अंगावर येणार असाल तर एक गोष्ट नक्की करा, अमिताभच्या चित्रपटात तो ॲम्बुलन्स घेऊन येतो तशी ॲम्बुलन्स घेऊनच या. कारण तुम्ही पायावर चालत जाणार नाही, तर जाताना आडवे होऊन स्ट्रेचरवर जाल, असा आसूड उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील मेळाव्यात ओढला होता. ठाकरे यांच्या या टिकेला उत्तर देताना शुक्रवारी देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना बोलबच्चन भैरवी अशी उपाधी दिली. अशांना मी उत्तर देत नाही, असा टोलाही त्यांनी हाणला.



## जमिनीच्या वादातून मारहाण आणि शिवीगाळ; आठ जणांविरोधात गुन्हा

**महाड : प्रतिनिधी**

हॉटेल जमिनीबाबत असलेल्या जुन्या वादातून एका जोडप्याला आठ जणांनी जिवे मारण्याचा प्रयत्न करून जातिवाचक शब्दप्रयोग व अश्लील वर्तन केल्याप्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात आठ आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १९ जून २०२५ रोजी दुपारी २:१५ च्या सुमारास हॉटेल मेजवानी किचन मध्ये.

प्रथमेश विजय जाधव, राहणार डोंगरीपूल, एमजी रोड, महाड रायगड यांनी दाखल केलेल्या फिर्यादीनुसार महाड शहर पोलीस ठाण्यात आठ जणांविरोधात ट्रॉसिटी व विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आल्याची घटना नुकतीच महाड शहरात घडली आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार फिर्यादी व आरोपीत यांच्यात शहरातील एम.जी. रोड येथील हॉटेल मेजवानी या हॉटेलच्या किचनच्या जागेवरून जुना वाद होता. याच वादावरून गुरुवार १९ जून २०२५ रोजी रात्री २:१५ चे सुमारास आरोपीत यांनी फिर्यादी व त्यांच्या पत्नीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न करीत अश्लील वर्तन व जातिवाचक शब्दप्रयोग केले.




दाखल केलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी प्रसाद रामकृष्ण जाधव,पूजा प्रसाद जाधव,दर्शन प्रसाद जाधव, यश प्रसाद जाधव, रोशनी यश जाधव, निर्मला सावंत, साहिल सावंतप्रवीण सावंत. सर्व राहणार काकरतळे महाड –रायगड यांच्याविरोधात ट्रॉसिटी, विनयभंग व जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलमांतर्गत गुन्हा दाखल केला असून घटनेचा अधिक तपास डीवायएसपी शंकर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाड शहर पोलीस करीत आहेत.

## दुर्गवीर प्रतिष्ठानतर्फे माणगाव तालुक्यातील आदिवासी पाड्यांमध्ये शैक्षणिक साहित्य वाटप

**माणगाव : बातमीदार**

महाराष्ट्रातील सोळा किल्ल्यांवर मागील सतरा वर्षांपासून जतन संवर्धन मोहिमा करत असलेल्या दुर्गवीर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य या संस्थेतर्फे माणगाव तालुक्यातील तासगाव आदिवासीवाडी, शिरवली तर्फ गोवेले आदिवासीवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.



माणगाव तालुक्यातील किल्ले मानगडावर सलग पंधरा वर्षांपासून संवर्धन मोहीमा राबवत असतानाच गड रहाळातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य, गणवेश , स्वेटर , क्रीडा साहित्य आजतागायत भेटस्वरुपात दिले आहेत. तसेच कुंभे , जोर धनगरवाडी , कुंभेवाडी अशा दुर्गम डोंगराळ भागातील नागरिकांसाठी सौरदिवे, गृहोपयोगी साहित्य , प्रथमोपचार संच इत्यादीचे वितरण केले आहे. तसेच सामाजिक बांधिलकीतून अनेक शाळांना लॅपटॉप, कॉम्प्युटर संच सुध्दा देणगीस्वरूपात दिले आहेत. शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम प्रसंगी तासगाव भागाड ग्रामपंचायत सरपंचांनी दुर्गवीर प्रतिष्ठानच्या या सातत्यपूर्ण समाजसेवेचे कौतुक केले.

या शैक्षणिक साहित्य वितरण कार्यक्रमात दुर्गवीर प्रतिष्ठानचे रायगड जिल्हाप्रमुख रामजी कदम, माणगाव तालुकाप्रमुख विठ्ठल केंबळे , माणगाव तालुका समन्वयक प्रमोद डोंगरे , दुर्गवीर रूपेश लाखाडे , अजित लाखाडे , सिध्दांत शिंदे उपस्थित होते

## निराधार बालकांना मिळणार आधार; जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचा पुढाकार

**अलिबाग : प्रतिनिधी**

समाजामध्ये असंख्य निराधार बालके आहेत अशा बालकांना कागदपत्री कोणतीही तरतूद नसल्यामुळे शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे असे दिसून आले आहे त्याचाच गांभीर्याने विचार करून निराधार बालकांना त्यांचे नैसर्गिक अधिकार देण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड यांच्यातर्फे निराधार व भटक्या सभातीच्या बालकांच्या हक्कांना आधार देण्याकरता साथी समिती गठीत करण्यात आली आहे.

साथी समितीचा मूळ उद्देश निराधार बालकांच्या हक्कांना आधार देणे म्हणजेच समाजामध्ये जे निराधार बालके आहेत ज्या बालकांना कोणताही आधार नाही कागदपत्री देखील कोणता पुरावा नाही अशा बालकांना साथी समितीतर्फे २७ जून ते पाच ऑगस्ट या कालावधीमध्ये मोहीम राबवली जाणार आहे. ही समिती निराधार बालकांचा सर्वे करून त्या बालकांना आवश्यक व महत्त्वाचे असणारे आधार कार्ड काढून देणार आहे.

त्यामुळे बालकांना त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी तसेच त्यांच्या अन्य वैयक्तिक ओळखी करता मोलाची मदत होणार आहे. या समितीमध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली व विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव व साथी समितीच्या अध्यक्षा तेजस्विनी निराळे यांच्या नेतृत्वाखाली ही विशेष मोहीम राबवली जाणार आहे.

समितीमध्ये विधी सेवा यंत्रणा, स्थानिक प्रशासन, सर्व तालुक्यांचे तहसीलदार, पोलीस, आरोग्य, शिक्षण विभाग, सामाजिक संस्था, बालकल्याण समिती, विधिज्ञ, विधी स्वयंसेवक तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी, महिला व बालविकास अधिकारी, पोलीस अधिकारी, संबंधित सर्व एनजीओ, शासकीय व अशासकीय संस्थांच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला असून सर्व शासकीय स्तरावर एकत्रित बालकांसाठी काम करून निराधार बालकांना न्याय देण्याचे कार्य राबविले जाणार आहे.

आपल्याला माहीत असलेल्या निराधार बालकांची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड अलिबाग या कार्यालयाकडे पाठवण्यात यावी व योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव व साथी समितीचे अध्यक्ष तेजस्वी निराळे यांनी केले आहे .

## राष्ट्रमाता जिजाऊंचे विचार प्रेरणादायी –मंत्री भरत गोगावले

**महाड : प्रतिनिधी**

राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांची ३५२ वी पुण्यतिथी आज पाचाड येथे समाधीस्थळी साजरी करण्यात आली. यावेळी बोलताना राष्ट्रमाता जिजाऊ मांसाहेबांचे विचार प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त करून ही प्रेरणा घेऊनच आपण प्रत्येक कामाला सुरवात करतो असे मत मंत्री भरतशेठ गोगावले यांनी व्यक्त केले.



पाचाड येथे राजमाता जिजाऊमाँसाहेबांची ३५२ वी पुण्यतिथी ज्येष्ठ कृ. शके १९४७ शुक्रवार दिनांक २० जून रोजी तिथीप्रमाणे साजरी करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्याचे फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांच्यासह जिल्हाधिकारी किसन जावळे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्रांताधिकारी पोपट ओमासे, तहसीलदार महेश शितोळे, पोलीस उपविभागीय अधिकारी शंकर काळे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मंत्री भरत गोगावले यांनी राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेबांचे विचार प्रेरणादायी असून राष्ट्रमाता जिजाऊ मांसाहेब आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आशीर्वादाने आपण काम करत असल्याचे सांगून या परिसराच्या विकासासाठी आपण अहोरात्र मेहनत घेत असल्यानेच आपण नेहमी निवडून येतो असे आवर्जून सांगितले. स्थानिक ग्रामस्थांनी आपण ज्या भूमीत राहतो त्याचे भान ठेवून जिजाऊ माँसाहेबांच्या पुण्यतिथीला आणि रायगडावर होणाऱ्या शिवराज्याभिषेक सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहिले पाहिजे असे आवर्जून सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी देखील ही भूमी छत्रपती शिवरायांच्या आणि महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी असल्याचे सांगून या ठिकाणी काम करताना अभिमान वाटतो असे स्पष्ट केले. पाचाड गावच्या सरपंच सीमा महेश मेंदूगडे यांनी सर्वांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र खातू तर आभार किरण घाडगे यांनी मानले.

## मुंबई–पुणे महामार्गावर ट्रेलरची कारला धडक, तीन जण जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई पुणे एक्सप्रेस वे वरून मुंबई पुणे जुन्या महामार्गावर येत असताना, खोपोली एक्झिट जवळ शुक्रवारी सायंकाळी ५.३० च्या दरम्यान ट्रेलरने ब्रेक फेल झाल्यामुळे समोर जाणाऱ्या स्कार्पिओला धडक दिली.या अपघातात तीन जण जखमी झाले

अपघातात स्कॉर्पिओ गाडी मधील योगेश गुरव ,शुभम चव्हाण, रोहित कुशाळकर हे तीन प्रवासी जखमी आहेत यापैकी कुशाळकर यांचा पायाला गंभीर दुखापत झाली आहे उर्वरित दोघे किरकोळ जखमी आहेत जखमींना खोपोली नगरपालिका हॉस्पिटलमध्ये आणले आहे. आय आर बी पेट्रोलिंग, डेल्टा फोर्स, देवदूत यंत्रणा, महाराष्ट्र सुरक्षा बल, महामार्ग वाहतूक यंत्रणा बोरघाट आणि खोपोली पोलीस, हेल्प फाउंडेशन कार्यकर्त्यांनी या अपघातात मदत कार्य केले आहे.



## श्रीवर्धन पालिकेच्या पाच शाळांमध्ये डिजिटल शिक्षणाची सुविधा

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन नगरपरिषदेच्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांना स्मार्ट शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी निधीतून एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवण्यात आला आहे. या उपक्रमाअंतर्गत नगरपरिषदेच्या शाळांमध्ये २९ इंटरॅक्टिव्ह डिजिटल बोर्ड, २९ संगणक आणि १२ प्रिंटर्स प्रदान करण्यात आले आहेत.



आजकाल सरकारी शाळांकडे विद्यार्थ्यांचा ओघ कमी झाला हे कानावर येते परंतु श्रीवर्धन नगरपरिषदेच्या शाळा याला अपवाद आहेत . दरवर्षी शाळांचा पटसंख्या वाढत आहे किंवा टिकून आहे . या उपक्रमासाठी खासदार सुनील तटकरे व महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या विशेष सहकार्याने निधी उपलब्ध करून देण्यात आल्यामुळेच हा प्रकल्प साकार होऊ शकला.या डिजिटल साधनांमुळे शाळांतील शिक्षण अधिक प्रभावी, रंजक व तंत्रज्ञानसमृद्ध होणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी निर्माण होऊन गुणवत्तेत वाढ होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

लोकार्पण सोहळ्यात महिला व बालविकास मंत्री यांनी इंटरैक्टिव बोर्ड्स चा कसा योग्य वापर करावा, शिक्षणातील रुची कल्पकता कशी वाढवी या बाबत मार्गदर्शन केले तसेच यापुढे सुद्धा नगरपरिषद शाळांमध्ये गुणवत्ता वाढी साठी ज्या नाविन्यपूर्ण बाबी करता येतील त्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल.ही आधुनिक शिक्षणसुविधा विद्यार्थ्यांसाठी एक मैलाचा दगड ठरेल आणि त्यांना डिजिटल युगाशी जोडण्यास मदत करेलअसे सांगितले.

## नवी मुंबईत बांधकामांना ऑफलाईन परवानग्या मिळणार; महापालिकांना शासनाने दिली मान्यता

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्यातील महानगरपालिकांना मंजूर केलेल्या युडीसीपीआर अंतर्गत विकास आणि बांधकाम परवानग्यांचे प्रस्ताव बिपीएमस प्रणालीतील त्रुटींमुळे वर्षे दीड वर्षे मंजुरीच्या प्रतीक्षेत राहत असल्याने अनेक विकासकामे खोळंबली होती. त्याबाबत खा. नरेश म्हस्के यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे या समस्या निवारणाबाबत पाठपुरावा केला होता.

या पाठपुराव्याला यश आले आहे. यापुढे (युडीसीपीआर) मधील विनियम क्र. १४.८ अर्बन रिन्यू स्कीम अंतर्गत दाखल होणाऱ्या विकास / बांधकाम परवानगी प्रस्तावांना ऑफलाईन पद्धतीने स्वीकारून त्यांना ऑफलाईन पद्धतीने मंजुरी देण्यात यावी यास नगरविकास विभागाने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे हजारो रहिवाश्यांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,खासदार नरेश म्हस्के शिवसेना उपनेते विजय नाहटा, जिल्हा प्रमुख किशोर पाटकर यांचे आभार मानले आहेत.

पान १ वरून

## खारघरमध्ये दारूबंदीसाठी आंदोलन





खारघर शहराला शैक्षणिक वारसा लाभलेला आहे. शहरामध्ये विविध माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालये अस्तित्वात असून खारघरची नोंद नो लिकर झोन अशी अनेक वर्षांपासून आहे, मात्र असे असतानाही खारघरमध्ये वाईन शॉप सुरू करण्यात आले. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी वाइन शॉपची परवानगी रद्द करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या आयुक्तांना पत्र दिले आहे. या पत्रात त्यांनी म्हटलेय की, खारघर येथील नागरिकांचा सुरुवातीपासूनच खारघरमध्ये दारू दुकाने आणि दारू बार येण्यास सक्त विरोध आहे. खारघरमध्ये दारूबंदीविषयी अनेक आंदोलने, निदर्शने झालेली आहेत. खारघर शहर दारूमुक्त घोषित करावे यासाठी जानेवारी २०२५पासून संघर्ष संस्थेच्या माध्यमातून शासनाकडे मागणी केलेली असून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जनआंदोलन सुरू आहे.

गोल्डन कॉईन वाईन मार्ट हे नवीन वाईन शॉप खारघर सेक्टर ६ येथे उघडण्यात आले आहे. या वाईन शॉपला सोसायटी किंवा पनवेल महापालिकेची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे समजते. वाईन शॉपला परवानगी दिली असल्यास ती रद्द करण्यात यावी अशी येथील नागरिकांची मागणी आहे.

दरम्यान, खारघरमध्ये दारूबंदीसाठी शुक्रवारी संघर्ष संस्थेच्या माध्यमातून सर्वपक्षीय आंदोलन करण्यात आले. गोल्डन कॉईन वाईन मार्टने अनधिकृतपणे बांधलेले शेड या वेळी महापालिकेच्या वतीने पाडण्यात आले. त्यानंतर जेजेस रसोई या रेस्टॉरंट ॲण्ड बारने बांबूचे शेड बांधण्याची परवानगी असतानाही लोखंडी बांधकाम काम केले होते. त्या विरोधात आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील यांनी आक्रमक भूमिका घेत जाब विचारला तसेच अनधिकृतपणे बांधण्यात आलेले बांधकाम महापालिकेच्या माध्यमातून पाडले.

या वेळी आमदार विक्रांत पाटील यांनी जनतेच्या भावनांना न्याय देण्यासाठी जो काही संघर्ष करावा लागेल तो करू, असे प्रतिपादन केले. या आंदोलनात भाजप जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, निलेश बाविस्कर, नरेश ठाकूर, शत्रुघ्न काकडे, गुरूनाथ गायकर, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, हर्षदा उपाध्याय, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस संध्या शारबिद्रे, शहराध्यक्ष साधना पवार, मंडळ सरचिटणीस दीपक शिंदे, संतोष शर्मा, उपाध्यक्ष किरण पाटील, अमर उपाध्याय, समीर कदम, निर्मला यादव, प्रिया दळवी, जुमा चक्रवर्ती, संजय घरत, कीर्ती नवघरे, अजय माळी, शैलेंद्र त्रिपाठी, अशोक जांगिड, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील यांच्यासह सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते, संघर्ष संस्थेचे पदाधिकारी, सदस्य आणि खारघरमधील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## मोहोपाड्यात शासकीय दाखले वाटप शिबिर

या शिबिरात ३००हून अधिक विद्यार्थी व नागरिकांना ज्येष्ठ नागरिक दाखला, जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, डोमेसाईल दाखला, रेशन कार्ड काढणे, नाव वाढवणे व कमी करणे, आधार कार्ड, अपडेट व नवीन काढणे अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. सूत्रसंचालन संतोष चौधरी यांनी केले.

# डीएव्ही पब्लिक स्कूलमध्ये युनिट टेस्टसाठी मराठीचा समावेश

## भाजपच्या पाठपुराव्याला यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमधील डीएवी पब्लिक स्कूलच्या इयत्ता तिसरी, चौथी व पाचवीच्या युनिट टेस्टच्या वेळापत्रकातून मराठी विषय वगळण्यात आल्याच्या तक्रारी पालकांकडून प्राप्त झाल्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या शिष्टमंडळाने शाळा प्रशासनाकडे ठोस पाठपुरावा केला. यानंतर शाळा व्यवस्थापनाने तातडीने मराठी भाषेचा समावेश करत सुधारित वेळापत्रक जारी केले आहे.



भाजपचे पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे यांनी शाळा प्रशासनास निवेदन दिले आणि मुख्याध्यापक घोष यांच्याशी याबाबत चर्चा केली. या वेळी माजी नगरसेवक समीर ठाकूर, प्रभाकर बहिरा, राजश्री वावेकर, किशोर चौतमोल, रुपेश नागवेकर, केदार भगत, प्रशांत शेटये, महेश राऊळ, भीमराव पोवार, वरुण डंगर, विवेक होन आदी उपस्थित होते. मराठी ही महाराष्ट्राची राज्यभाषा असून शालेय अभ्यासक्रमातून किंवा परीक्षांमधून तिचा वगळलेला समावेश अत्यंत निषेधार्ह आहे, असे भाजप पदाधिकाऱ्यांनी सांगत, मराठी विषय युनिट टेस्टमध्ये न समाविष्ट केल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला होता. प्रशासनाने याची गंभीर दखल घेत पुढील युनिट टेस्टमध्ये मराठी विषयाचा समावेश करत सुधारित वेळापत्रक प्रसिद्ध केले. त्यामुळे तात्काळ कार्यवाही केल्याबद्दल शिष्टमंडळाने घोष यांचे पुष्पगुछ देऊन आभार व्यक्त केले. तसेच पालकांनीही समाधान व्यक्त करत भारतीय जनता पार्टी आणि शाळा प्रशासनाचे आभार मानले आहेत.

# सैनिकी स्कूल परीक्षेत पनवेलचे विद्यार्थी चमकले

### कळंबोलीत गुणगौरव सोहळा



**पनवेल : वार्ताहर,**
**कळंबोली : बातमीदार**

लोकसेवा आयोगाच्या परीक्षा बरोबरच राष्ट्रीय सैनिक स्कूल परीक्षेमध्ये सातत्याने उत्तरेकडील राज्यांचा दबदबा राहिलेला आहे. मात्र हे मक्तेदारी आता महाराष्ट्रातील विद्यार्थी ही मोडीस काढू पाहत आहेत. या प्रवेश परीक्षेमध्ये पनवेलचे मुले मुली सुद्धा चमकले. कळंबोली येथील आयकॉन ट्रेनिंग इन्स्टिट्यूटच्या तब्बल १५ विद्यार्थ्यांनी २५० हून अधिक गुण मिळवत आपल्यातील गुणवत्ता सिद्ध केली. या यशस्वी विद्यार्थ्यांचा वसाहतीतील ससून हॉलमध्ये गुणगौरव करण्यात आला.

देशभरामध्ये विविध शहरांमध्ये सैनिकी स्कूल आहेत. अत्यंत दर्जेदार शिक्षण, त्याचबरोबर शिस्तप्रियता, देशप्रेम याव्यतिरिक्त आय ए एस, आय पी एस आणि एनडीए मध्ये जाण्यासाठी खडतर प्रशिक्षण आणि शिक्षण देणाऱ्या या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना सहज प्रवेश मिळत नाही. त्यासाठी दरवर्षी प्रवेश परीक्षा घेतली जाते. प्रचंड स्पर्धा आणि त्याचबरोबर अत्यंत अवघड ही परीक्षा असते. कळंबोली येथे आय कॅन ट्रेनिंग इन्स्टिट्यूटमध्ये विद्यार्थ्यांना यासाठी तयार केले जाते. त्यांना अभ्यासक्रम शिकून त्यांची पूर्णपणे तयारी करून घेतली जाते.


आय कॅन चे संस्थापक नवनाथ देशमुख, संकल्प शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या संस्थापिका वैशाली जगदाळे, माजी आरोग्य निरीक्षक दौलत शिंदे, इन्स्टिटयूटच्या कळंबोली केंद्राच्या संचालिका सीमा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारण्यात आली.

सैनिकी स्कूलमध्ये प्रवेश घेण्यात मराठी मुलं दुर्दैवाने इतर राज्यांच्या तुलनेत मागे होते, मात्र अलीकडे आय कॅन ट्रेनिंग इन्स्टिट्यूट सारख्या संस्थांकडून या परीक्षेचा प्रचार आणि प्रसार करण्यात आल्याने मराठी मुलं यामध्ये यशस्वी होत आहेत.

## निवडक

### नवीन पनवेल येथील व्यक्ती बेपत्ता

**पनवेल** : अशोक रमेश इंगळे (२३ रा.नवीन पनवेल) राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कुठेतरी



निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.अंगाने मध्यम, रंग गोरा, डोळे घारे, डोक्याचे केस साधारण वाढलेले, उंची ५ फुट, डाव्या हाताच्या बोटावर इंग्रजीमध्ये स्वतःचे नाव नोंदलेले आहेत. दोन्ही हातावर ब्लेडने मारुन घेतल्याचे जुने व्रण आहेत. मिशी जाड काळी, दाढी साधारण वाढलेली, त्याला मराठी भाषा अवगत आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा पो.हवा.चेतन पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

### पाण्याच्या डबक्यात आढळला मृतदेह

**पनवेल** : भिंगारवाडी बस स्टॉपच्या जवळ मुंबई येथे पुणे हायवेच्या बाजूला पाण्याच्या डबक्यामध्ये बेशुद्ध अवस्थेत एक अनोळखी इसम सापडून आला. त्याला रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. या इसमाचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्ष असून उंची पाच फूट पाच इंच आहे. त्याचा चेहरा गोल असून दाढी, मिशा वाढलेल्या आहेत. अंगामध्ये फिकट हिरव्या रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट आणि काळ्या रंगाची फुल पॅन्ट घातली आहे. या इसमाबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस उपनिरीक्षक गोकुलदास मेश्राम यांच्याशी संपर्क साधावा.

### स्टोअर रूममधील साहित्याची चोरी

**पनवेल** : तक्का येथील स्टोअर रूम मधील एक लाख ८४ हजार रुपयांच्या साहित्याची चोरी केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.के मॉल, तक्का या ठिकाणी निलसिद्धी लाईफ स्पेस या नावाने कन्स्ट्रक्शनचे काम चालू होणार आहे. या ठिकाणी कन्स्ट्रक्शनचे साहित्य ठेवण्यासाठी पत्रा मारून स्टोअर रूम बनवले आहेत. तेथे बांधकामासाठी साहित्य ठेवले होते. स्टोअर रूमचे कडी कोयंडा तोडून चोरांनी आतील साहित्याची चोरी केली.

### कारचा दरवाजा उघडल्याने वृद्ध जखमी

**पनवेल** : कारचालकाने गाडीचा दरवाजा अचानक उघडल्याने मोटरसायकलला धक्का लागून ६२ वर्षीय इसम खाली पडुन जखमी झाले. या प्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आनंदराव जाधव हे नवरंग चौक येथे मिठाईच्या दुकानात जात असताना मेडिकलच्या समोर रस्त्याच्या कडेला चार चाकी गाडी उभी होती. ते गाडीच्या बाजूने जात असताना चालकाने अचानक दरवाजा उघडला. त्यामुळे त्यांच्या मोटरसायकलला दरवाजा लागून ते खाली पडले. त्यात त्यांच्या डोक्याला पायाला व खांद्याला मार लागला आणि ते जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### झाड पडून वाहनांचे नुकसान

**पनवेल :** गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यात वादळी वाऱ्यामुळे झाड उन्मळून पडल्याने खारघरमध्ये तीन वाहनांचे तर तळोजा येथे एका कारचे नुकसान झाले आहे.वादळी वार्यामुळे गायत्री हेरिटेज सोसायटी आणि उद्यानाच्या भिंतीलगत असलेली झाडे कोसळून जवळपास पाच कारचे मोठे नुकसान झाले आहे; तर तळोजा फेज एक येथील गामी सोसायटीसमोरील रस्त्यावर उभा असलेल्या वाहनावर एक झाड उन्मळून पडल्याने वाहनाचे किरकोळ नुकसान झाले आहे.

### चिमुकलीशी चाळे, आरोपी अटकेत

**नवीन पनवेल :** पाच वर्षीय मुलीसोबत अश्लील कृत्य केल्याप्रकरणी आकाश अशोक भगत (रा. उसर्ली खुर्द) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी आकाश भगत (वय २५) याने पाच वर्षीय पीडित मुलगी तिच्यासोबत १२ जून रोजी दुपारी अडीचच्या सुमारास इमारतीच्या खाली असणाऱ्या बाथरूममध्ये अश्लील कृत्य केले. त्यानंतर पिडीतेच्या आईने पनवेल पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपीला अटक केली आह.

# करंजाडे वसाहतीत धूरफवारणीची मागणी

## ◆ माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांचे आरोग्य अधिकाऱ्यांना पत्र

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे वसाहतीमध्ये पावसाळ्यात डासांचे प्रमाण वाढले असून वसाहतीतील नागरिकांना आजारपणाचा सामना करावा लागत असल्याने त्यांच्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी करंजाडे वसाहतीमध्ये धूर फवारणी करण्याबाबत सिडकोच्या आरोग्य अधिकाऱ्यांना भाजपचे करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे व भाजप कार्यकर्त्यांनी भेट घेत मागणी केली, यावेळी अधिकाऱ्यांनी लवकरच फवारणी सुरु करण्याचे आश्वासन आंग्रे यांना दिले आहे.



गेल्या काही दिवसांपासून सतत सुरू असलेल्या पावसाने करंजाडे वसाहतीतील रस्त्यांची चाळण झाली आहे. ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य दिसत आहे. स्मार्टसिटी अंतर्गत सुरू असलेल्या कामांसाठी केलेले खड्डे वेगळे. यात पावसाचे मोठ्या प्रमाणावर पाणी साचून आरोग्याच्या समस्या निर्माण होण्यासाठी निमंत्रण देत आहे. साचलेले पाणी आणि विविध ठिकाणी पडून असलेला कचरा यावर पावसाचे पाणी पडून कचरा कुजला आहे. अशी दोन्ही ठिकाणे डास उत्पत्तीचे केंद्र ठरत आहेत. डासांमुळे आजारी पडण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे करंजाडे वसाहतीतील प्रत्येक लहान मोठे क्लिनिक, रुग्णालय सध्या रुग्णांनी हाऊसफुल्ल असल्याचे दिसून येत आहे. तसेच कुजलेल्या कचऱ्यामुळे डासांचे प्रमाण तर वाढलेच आहे. शिवाय परिसरात दुर्गंधी पसरली आहे.

रहिवाशांना यामुळे आरोग्याचा त्रास जाणवत आहे. डासांपासून बचावासाठी पावसाळी गारटच्या वातावरणातही नागरिकांना पंखा लावण्याची वेळ आली आहे. तर काहींनी मच्छरदाणीचा वापर सुरू केला आहे. यापुढे आणखी भयावह परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी औषध फवारणी करावी तसेच वेळोवेळी धूर फवारणी करावी. डास उत्पत्ती केंद्र असलेले खड्डे त्वरित बुजविण्याची करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी केली आहे. आरोग्य अधिकाऱ्यांनी लवकरच उपाययोजना करू, असे आश्वासन या वेळी आंग्रे यांनी दिले.



**पनवेल : वेश्वी गावातील रहिवासी आणि सिडकोचे निवृत्त कर्मचारी सुनील वाघमारे यांचा मुलगा मानस वाघमारे याने पायलट होण्याचे आपले स्वप्न पूर्ण केले आहे. त्याच्या या यशाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मानसचे अभिनंदन केले आणि त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या वेळी सिडको युनियनचे अध्यक्ष रोहिदास मुंबईकर, कामगार नेते विनायक मुंबईकर, सुहास मुंबईकर आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भारतीय जनता पक्षाचे नेते तथा महाराष्ट्र प्रदेश वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभूदास भोईर यांचा वाढदिवस शुक्रवारी साजरा झाला. त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन प्रभूदास भोईर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी सुरेश भोईर, शंकुनाथ भोईर, मिन्नात भोईर, अमर उलवेकर, प्रभाकर उलवेकर, कमलाकर भोईर, सुजित भगत उपस्थित होते.**

# प्रभूदास भोईर यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे नेते तथा महाराष्ट्र प्रदेश वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभूदास भोईर यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा झाला.

यानिमित्ताने कळंबोलीमध्ये विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि भाजपचे ज्येष्ठनेते अरुणशेठ भगत यांनी प्रभूदास भोईर यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करुन त्यांनावाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.





कळंबोलमध्ये वाढदिवसानिमीत्त स्थानिक प्रकल्पग्रस्त टेम्पो चालक मालक संघटनेच्यासौजन्याने महाराष्ट्र प्रदेश वाहतूक संघटनेच्या माध्यामतून लोकनेते स्व. दि.बा.पाटील साहेब वाचनालय सुरु करण्यात आले आहे. या वाचनालयाचे उदघाटन भाजपचे ज्येष्ठनेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते आणि जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

यावेळी अरुणशेठ भगत यांनी प्रभूदास भोईर यांनावाढदिवसाच्या शुभेच्छा देत भारतीय जनता पक्षाची ताकद आणखी कशी वाढेलयासाठी सवारनी प्रयत्न करावे असे आवाहन केले. या कार्यक्रमानंतर खिडूकपाडा येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रभूदास भोईर यांच्या माध्यामतून शाळेला५० हजार रुपयांची देणगी देण्यात आली. गावातील मुलांना विविध सुविधा उपलब्धव्हावा तसेच त्यांना कोणत्याही प्रकारची समस्या उद्भवू नये या भावनेतून त्यांनी ही मदत शाळेला करण्यात आली.

कळंबोलीमध्ये भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठनेते अरुणशेठ भगत यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते वृक्षरोपण करण्यात आले.

या कार्यक्रमावेळी भाजपचे पनवेल तालुका पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पवन भोईर, नितेश सोलकी, माजी नगरसेवक रवींद्र भगत, भाजपचे खिडूकपाडा गाव अध्यक्ष शंकुनाथ भोईर, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य प्रभाकर उलवेकर माजी अध्यक्ष अमर उलवेकर, मिन्नथ भोईर, सुजित भगत, भुषण म्हात्रे, रखाराम उलवेकर,राम खुडे, टेम्पोनाका अध्यक्ष चंद्रकांथ खानावकर, ज्ञानेश्वर पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी ओरिएंटेशन प्रोग्राम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शुक्रवारी (दि.२०) वाणिज्य व विज्ञान शाखेच्या संयुक्त विद्यमाने तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी ओरिएंटेशनचे आयोजन केले होते. या ओरिएंटेशनसाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी उपस्थित राहून महाविद्यालयात घेतले जाणारे सामाजिक व पर्यावरणीय उपक्रम तसेच विविध कोर्सेस, अभ्यासक्रम, प्लेसमेंट



ड्राईव्ह,वेगवेगळ्या नामांकित संस्थांबरोबर असणारे सामंजस्य करार व त्यातून होणारे माहितीचे आदान-प्रदान तसेच शिस्तीबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.

यावेळी महाविद्यालयातील अंतर्गत सिद्धता कक्षाचे समन्वयक प्रा. प्रथमेश उदेकर हेही उपस्थित होते. या ओरिएंटेशन प्रोग्रामचे आयोजन प्रा. डॉ. रीत ठुले व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभाग प्रमुख, सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शुक्रवार दिनांक २० जून रोजी सकाळी १०.०० वाजता स्टाफ वेल्फेअर समिती व आर्ट ऑफ लिव्हिंग फाउंडेशन खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने योग सत्राचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व शाखेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या वेळी आर्ट ऑफ लिव्हिंगच्या योग तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थितांनी विविध योगासनांचा सराव केला तसेच श्वसनाचे महत्त्व, ध्यानधारणा आणि शारीरिक-मानसिक आरोग्य याबाबत मार्गदर्शन करण्यात



आले. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांच्या हस्ते करण्यात आले

यावेळी त्यांनी आपल्या भाषणात योगाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. यावेळी महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक प्रा. प्रथमेश उदेकर हेही उपस्थित होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील मोठ्या संख्येने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.


## संपादकीय

# विनाशाची भीती

इराण–इस्रायल संघर्षाकडे जगभरातील देशांचे लक्ष आहे. इराणच्या अणुकेंद्रांवर इस्रायलने हल्ले केल्यामुळे विनाशकारी परिणामांची भीती यापूर्वीही वाटत आली आहेच. त्यात या युद्धात इस्रायलच्या बाजूने अमेरिका ओढली गेल्यास युद्धाची व्याप्ती वाढून त्याचे परिणाम मोठा विनाश घडवणारे होऊ शकतील का याची भीती अनेकांना वाटते आहे. हा संघर्ष आखातातील इतर देशांपर्यंतही पसरणार का, याचीही चिंता आहेच.

**सुरूवातीपासूनच इस्रायल–इराण संघर्षाकडे जगभराचे लक्ष आहे ते मुख्यत: तेलनिर्मितीचे केंद्र असणाऱ्या मध्य पूर्व आशियात हा संघर्ष सुरू असल्यामुळेच. इराण हा एक महत्त्वाचा तेल उत्पादक देश आहे. जगभरातल्या एकूण तेल पुरवठ्यापैकी ३ टक्के पुरवठा हा इराणकडून केला जातो. हा संघर्ष सुरू झाल्यापासून ब्रेंट क्रूडच्या दरांमध्ये ७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यातच होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा इशारा इराणने दिला आहे. जगभरातील २० टक्के क्रूड ऑइल आणि नॅचरल गॅससारखी उत्पादने याच समुद्री मार्गाने वाहून नेली जातात. त्यामुळे हा जलमार्ग बंद होण्याची प्रचंड धास्ती जगभरातील अनेक देशांना वाटते आहे. कच्च्या तेलाची वाहतूक कमी झाल्यास महागाई आणखी वाढेल. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आयातशुल्काशी संबंधित धोरणाची झळ अनेक देशांना आधीच बसली आहे. इराण–इस्रायल संघर्ष आणखी काळ सुरू राहिल्यास जगभरातील क्रूड तेल आयात करणाऱ्या देशांना त्याची झळ पोहोचेल. भारताचे इराण आणि इस्रायल या दोन्ही देशांशी व्यापारी संबंध आहेत. त्यांच्यातील संघर्षाचा परिणाम भारताच्या व्यापारावर होऊ शकतो. या आर्थिक कारणांखेरीज इस्रायल आणि इराण हे दोन्ही देश शक्तिशाली सत्ता असल्यामुळे त्यांची आक्रमकता हाही जगभरासाठी काळजीचा विषय आहेच. इस्रायलच्या हल्ल्यात आपण सहभागी नसल्याचे अमेरिकेने यापूर्वी म्हटले आहे. पण इराणला मात्र इस्रायलची आक्रमकता ही अमेरिकेच्या पाठिंब्यानेच सुरू आहे असे ठामपणे वाटते. अमेरिकेने इस्रायली हल्ल्यांना छुप्या पद्धतीने मदत केली आहे असे इराणचे म्हणणे आहे. त्यामुळे इस्रायलला प्रत्युत्तर देताना इराण अमेरिकेच्या मध्य पूर्वेतील तळांवर हल्ला करू शकतो. अमेरिकेला अशा हल्ल्यांची भीती वाटत असल्यानेच त्यांनी तेथील दूतावासांतील कर्मचाऱ्यांना आधीच माघारी बोलावले आहे. अमेरिकेने सुरूवातीलाच इशारा दिला होता की अमेरिकेच्या तळांवर वा ठिकाणांवर इराणने हल्ला केल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. जर अमेरिकेच्या नागरिकांना या संघर्षात झळ पोहोचली तर ट्रम्प यांना इराणला प्रत्युत्तर देण्यावाचून गत्यंतर राहणार नाही. आपण नवीन युद्ध सुरू करणार नाही असेही ट्रम्प यांनी म्हटले आहे. परंतु इराण–इस्रायल युद्धात इराणची राजधानी तेहरानच्या जवळ असलेला पाकिस्तान महत्त्वाची भूमिका बजावू शकतो हे ध्यानात घेऊनच ट्रम्प यांना सध्या पाकिस्तानप्रेमाचे उमाळे आले आहेत. इस्रायलने इराणच्या काही अणुशास्त्रज्ञांना मारले असले तरी इराणकडे अणुबॉम्ब बनवण्याचे असलेले ज्ञान काही त्यामुळे नष्ट झालेले नाही. या दोन देशांमधील संघर्ष आता जिथवर पोहोचला आहे त्यामुळे इराणला तातडीने अणुसज्ज व्हावेसे वाटले तर काय, याची भीतीही आहे. हा संघर्ष दीर्घ काळ सुरू राहिल्यासही जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा धक्का बसणार आहे. जगातील अनेक देशांमध्ये आधीच राहणीमानाचा खर्च वाढलेला असून लोक महागाईच्या संकटाला कसेबसे तोंड देत आहेत.**

# योगसाधना : आरोग्याची गुरूकिल्ली



आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. वेगवान तंत्रज्ञान, वाढती स्पर्धा आणि आर्थिक गरजांमुळे माणूस स्वतःच्या शरीर आणि मनाकडे दुर्लक्ष करू लागला आहे. या सततच्या धावपळीत तणाव, नैराश्य, निद्रानाश, लठ्ठपणा यांसारख्या समस्या वाढीस लागल्या आहेत. अशा परिस्थितीत योग हा जीवनाला नवीन दिशा देणारा मार्ग ठरतो आहे. केवळ शारीरिक नव्हे; तर मानसिक व आध्यात्मिक आरोग्यासाठी योग ही एक प्रभावी आणि शाश्वत पद्धत आहे.

भारतात योगाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पतंजली मुनींच्या काळापासून योगा भारतात रुजत आहे. स्वामी विवेकानंदांनी भारतात तसेच जगभर योगाचा प्रसार केला. आज भारतात स्वामी रामदेवबाबा आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री श्री रविशंकर तसेच विविध योगगुरु यांच्या माध्यमातून योगाचा प्रसार होत आहे. जगभर योगाचा प्रचार आणि प्रसार व्हावा म्हणून भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हा प्रस्ताव मांडला. योगासनाचे फायदे त्यांचे मानवी मन व शरीरावर होणारे परिणाम याचे विस्तृत विवेचन करण्यात आले. काही देशांच्या प्रतिनिधींशी चर्चा करून हा प्रस्ताव मान्यतेसाठी महासभेपुढे ठेवण्यात आला. संयुक्त राष्ट्राच्या १९३ देशांपैकी १७५ देशांचे सहप्रतिनिधी लाभले. प्रथमच एखाद्या प्रस्तावाला एवढ्या देशांचे प्रतिनिधी लाभले. विशेष म्हणजे संयुक्त राष्ट्रातील सुरक्षा आयोगाचे कायमस्वरूपी सदस्य असलेले चीन, फ्रान्स, रशिया, इंग्लंड आणि अमेरिका हे देश या प्रस्तावाचे सह प्रतिनिधी आहेत. या प्रस्तावावर सदस्य राष्ट्रांच्या सह्या झाल्यावर २१ जून हा दिवस जागतिक योग दिवस म्हणून घोषित करण्यात आला.

२१ जून हा दिवस जगभरातील अनेक देशांमध्ये सर्वात मोठा दिवस असतो. त्यामुळे या दिवसाला विशेष महत्त्व आहे म्हणून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात यावा, असा प्रस्ताव मांडण्यात आला. योग ही कोणत्याही धर्माची परंपरा व अभ्यास नसून ती वैज्ञानिक पंथनिरपेक्ष व सर्वंकष जीवनपद्धती आहे. रुग्णांसाठी ही एक चिकित्सा पद्धत तर योगिन साठी साधना पद्धत, मुक्तीचा मार्ग व जीवनात पूर्णता आणण्याचे हे साधन आहे.

योग हा शब्द संस्कृतमधील 'युज' या धातूपासून तयार झाला असून, त्याचा अर्थ आत्म्याचे परमात्म्यात एकरूप होणे असा आहे. योगाचा मूलभूत उद्देश म्हणजे ध्यान व आसनाच्या माध्यमातून शरीर आणि मन यांचे परिपूर्ण संतुलन साधणे. महाभारत, उपनिषदे, पतंजलींचे योगसूत्र तसेच हठयोगप्रदीपिका यांसारख्या हिंदू ग्रंथांमध्ये योगाचे मूळ स्वरूप आढळते. मनःस्वास्थ्य व उत्तम आरोग्यासाठी नियमित योगाभ्यास करणे आवश्यक आहे. योगाच्या साह्याने शरीरातील सर्व अवयव क्रियाशील व निरोगी राहतात. शरीर अधिक लवचिक बनते आणि कोणतेही कार्य अधिक सहजतेने करता येते. योग हा केवळ व्यायाम नसून एक शाश्वत जीवनशैली आहे, ज्याचा स्वीकार प्रत्येकाने दीर्घकालीन आरोग्यासाठी अवश्य करावा.

योगाचे फायदे केवळ वजन घटवण्यापुरते मर्यादित नाहीत, तर ते संपूर्ण शरीर, मन आणि आत्म्याच्या आरोग्यासाठी अमूल्य ठरतात. योगाच्या नियमित सरावामुळे शरीर मजबूत व लवचिक बनते, त्वचा तेजस्वी होते आणि मन शांत, प्रसन्न राहते. सूर्यनमस्कार, कपालभाती, प्राणायाम यांसारख्या क्रियांनी वजन नियंत्रणात राहते व शरीर तंदुरुस्त होते. रोज काही मिनिटांचा योगसाधनेचा सराव केल्याने मनातील व शरीरातील ताणतणाव दूर होतो. धकाधकीच्या जीवनातून थोडा वेळ स्वतःसाठी काढून योग आणि ध्यान केल्यास मानसिक स्थैर्य प्राप्त होते. योगामुळे शरीराचे संतुलन सुधारते, सुप्त ज्ञानशक्ती जागृत होते आणि अशुभ विचार व अज्ञान दूर होतात. अशा प्रकारे योग हा आरोग्य व आत्मशांतीकडे नेणारा प्रभावी मार्ग आहे.

योग हे मनुष्याच्या बाह्य व आंतरिक विकास घडवून आणण्याचे सर्वांगीण साधन व माध्यम आहे. रोगमुक्त, तणावमुक्त, व्यसनमुक्त राहण्यासाठी आणि आयुष्यात सुख, समृद्धी व शांतता आणण्यासाठी सकाळी व संध्याकाळी एक तास योगासाठी देणे आवश्यक आहे. तर ते जे करतात त्यांच्या जीवनात प्राधान्य आपोआपच पूर्ण होऊ लागतात. योग म्हणजे मानसिक व शारीरिक स्वास्थ्य सांभाळण्याची एक बहुगुणी आणि प्राचीन पद्धत. आजकालच्या धकाधकीच्या आयुष्यात थोडा वेळ तरी योगासाठी देणे आवश्यक आहे. ताणतणावांवर मात करणं, फिटनेस राखणे यासाठी नित्य योगासनं करणं फायदेशीर ठरतं. म्हणूनच आजपासूनच योगसाधना सुरू करा.


**–एच.एन. पाटील, उपशिक्षक**
**तु.ह.वाजेकर विद्यालय, फुंडे**

# डॉ. केशव हेडगेवार : राष्ट्रभक्ती, शिस्त आणि आत्मबलिदानाचे प्रतीक

नागपूरच्या एका सर्वसामान्य ब्राह्मण कुटुंबात १ एप्रिल १८८९ रोजी जन्मलेले डॉ. केशव बळीराम हेडगेवार हे केवळ भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचे योद्धे नव्हते, तर हिंदू संघटनेचे प्रणेते होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) संस्थापक म्हणून त्यांची ओळख आजही राष्ट्रभक्ती, शिस्त आणि आत्मबलिदानाचे प्रतीक मानली जाते. २१ जून ही त्यांची पुण्यतिथी. त्यानिमित्त त्यांच्या आठवणींचा जागर... १८९७ साली जेव्हा ब्रिटीश महाराणी व्हिक्टोरियाच्या राज्यारोहणाची ६०वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला आणि शाळेत मिठाया वाटल्या गेल्या, तेव्हा अवघ्या आठ वर्षांच्या केशवने ती मिठाई गुलामीचे प्रतीक मानून कचऱ्याच्या पेटीत टाकली. एवढेच नव्हे तर १९०८मध्ये इंग्रज निरीक्षकाच्या दौऱ्यात त्यांनी वंदे मातरमचा नारा दिला आणि त्याबद्दल त्यांना शिक्षा देत शाळेतून निलंबित करण्यात आले. लहान वयातच त्यांनी इंग्रजांच्या सत्तेला आव्हान दिले.

**डॉक्टरी शिक्षण, पण ध्येय वेगळे**

कोलकात्यातून वैद्यकीय शिक्षण घेत असताना ते अनुशीलन समिती आणि 'युगांतर' सारख्या क्रांतिकारी गटांशी जोडले गेले. 'केशब चक्रवर्ती' या टोपणनावाने काकोरी कटात सहभागी झाले, मात्र नंतर त्यांना जाणवले की, भारतासारख्या देशात केवळ शस्त्रक्रांतीने स्वातंत्र्य शक्य नाही. हिंदू समाजाला संघटित करून



राष्ट्रीय चेतना निर्माण करणे हीच स्वातंत्र्याची खरी वाट ठरू शकते. या विचाराने त्यांच्या आयुष्याला नवी दिशा दिली.

**संघाची स्थापना – विजयादशमी, १९२५**

२७ सप्टेंबर १९२५ रोजी विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर त्यांनी नागपुरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. त्यांचा उद्देश होता, हिंदू समाजात एकता निर्माण करणे, आत्मविश्वास जागवणे आणि संस्कृतीची पुनर्स्थापना. शाखा पद्धतीद्वारे त्यांनी संघटन बांधले. प्रत्येक स्वयंसेवकाशी व्यक्तिगत संपर्क आणि संवाद ठेवून त्यांनी संघाचा भक्कम पाया रचला. आज ठ्ठड हे जगातील सर्वात मोठे स्वयंसेवी संघटन मानले जाते.

**काँग्रेसशी मतभेद, पण राष्ट्रकार्य अविरत**

१९२०मध्ये नागपूर काँग्रेस अधिवेशनात त्यांनी 'पूर्ण स्वराज्य'चा ठराव मांडला होता, जो तत्कालीन नेत्यांनी फेटाळला. (१९३० मध्ये गांधीजींच्या मीठाच्या सत्याग्रहात त्यांनी सहभाग घेतला आणि नऊ महिने तुरुंगवास भोगला, मात्र वैचारिक मतभेदामुळे त्यांनी शेवटी स्वतंत्र मार्ग निवडला. २१ जून १९४० रोजी नागपुरात त्यांचे निधन झाले. मृत्यूपूर्वी त्यांनी गुरुजी माधव सदाशिव गोळवलकरयांना उत्तराधिकारी म्हणून निवडले. आजही त्यांच्या विचारांची प्रेरणा लाखो **स्वयंसेवकांच्या जीवनात झळकते.** डॉ. केशव हेडगेवार हे एक द्रष्टे नेता, निर्भय देशभक्त आणि कुशल संघटक होते. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांचे योगदान स्मरणात ठेवून आपण हिंदू समाजाच्या एकतेचा आणि संस्कृतीच्या पुनर्जागरणाचा संकल्प करणे, हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल.

(साभार संदर्भ : न्यूज डंका)



## बदलते तंत्रज्ञान

### तुमचा फोन रेकॉर्ड तर होत नाहीय ना? असे ओळखा




जेव्हा आपण फोनवर कोणाशी बोलतो तेव्हा ती गोष्ट तिसर्या व्यक्तीपर्यंत पोहोचू इच्छित नाही, पण, स्मार्टफोनवर बोलत असताना कॉल रेकॉर्डिंगचा धोका असतो. समोरची व्यक्ती कॉल दरम्यान तुमचा कॉल रेकॉर्ड करत आहे की नाही हे तुम्हाला कसे कळेल ते आम्ही तुम्हाला सांगतो.

**कॉल रेकॉर्डिंग सुरू आहे का हे जाणून घेण्याच्या सोप्या आयडिया...**

जर तुम्हाला कॉल आला किंवा तुम्ही एखाद्याला कॉल केला आणि फोन रिसिव्ह केल्यानंतर काही सेकंदांनंतर तुम्हाला बीपचा आवाज आला, तर तुमचा कॉल रेकॉर्ड होत असण्याची शक्यता आहे. अनेक वेळा ॲप्सद्वारे रेकॉर्डिंग करताना मध्येच बीप–बीपचा आवाज येतो.

कॉलवर बोलत असताना फोन खूप गरम होत असेल तर कदाचित तुमचा कॉल रेकॉर्ड होत असेल, तसेच तुम्ही कुणासोबत बोलत असाल आणि तुम्हाला आजुबाजुचा जास्त आवाज येत असेल तर कदाचित तुमचे बोलणे रेकॉर्ड होत आहे.

तुम्ही तुमच्या फोनमधील डेटाचा वापरही तपासावा. कॉलिंग ॲप्समध्ये डेटाचा जास्त वापर होत असेल तर तुमचा कॉल रेकॉर्ड होण्याची शक्यता आहे. हे ॲप तुमची वैयक्तिक माहिती दुसऱ्या सर्व्हरवर सेव्ह करत असण्याची शक्यता आहे.

कॉलिंगदरम्यान तुमच्या फोनच्या स्क्रीनवर माईकचा आयकॉन येत असेल, तर समजावे की तुमचा कॉल रेकॉर्ड होत आहे.

अनेक फोनमध्ये रेकॉर्डिंगची सुविधा नसते. त्यामुळे जर कोणी फोन स्पीकरमध्ये ठेवून बोलत असेल, तर तो दुसऱ्या फोनवरून तुमचे बोलणे रेकॉर्ड करत असल्याची शक्यता आहे. जर कॉल जास्त वेळ स्पीकरवर असेल, तर तुमचा कॉल रेकॉर्ड होत असण्याची शक्यता आहे.

# आज जागतिक संगीत दिन



**निमित्त**

संगीत आवडत नाही, संगीताशी आपला काही एक संबंध नाही, असे म्हणणारा मनुष्य क्वचितच सापडेल. कुठेही गाण्यांचा आवाज ऐकताच आपले कान लगेच त्या नादमाधुर्याचा वेध घेतात. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर आणि क्षणाक्षणाला संगीत आपल्याला साथ देत असते. नैराश्य, तणावसारख्या आजारांना सामोरे जातो, तेव्हा त्यातून बाहेर पडण्यासाठी संगीत मुख्य भूमिका पार पाडत असते. प्रत्येक सुख, दुःखाच्या क्षणी आपल्याला संगीत यथोचित साथ देत असते. जन्मापासून ते अगदी मृत्यूपर्यंत मानवासोबत संगीत असतेच. जीवनातला खरा सोबती संगीत आहे, असे म्हणायला काही हरकत नाही.

आज जे व्यक्ती नैराश्य, तणाव, चिंता अशा परिस्थितीतून जात आहे त्यांना यातून बाहेर पडण्यासाठी संगीताची मदत होत असते. आज आपल्या जीवनाचे कुठलेच असे क्षेत्र नाही जिथे संगीताला महत्व नाही. रुग्णालयातील रूग्णांना बरे करण्यासाठी देखील आज म्युझिक थेरपीच कामाला येते आहे. एवढेच काय तर कुठलाही आनंदाचा क्षण साजरा करायला आपण पहिले म्युझिक लावत असतो. मग ती एखादी बर्थ डे,सेलिब्रेशन पार्टी असो किंवा लग्न समारंभ असो.

आपल्या जीवनात संगीताची किती मोठी आणि मोलाची भुमिका आहे? किती अधिक महत्व आहे? हे जगातील सर्व लोकांना समजावून सांगण्यासाठी, त्यांना संगीताचे महत्व आणि फायदे पटवून देण्यासाठी दरवर्षी हा जागतिक संगीत दिवस साजरा केला जातो. २१ जुनला दरवर्षी जागतिक संगीत दिवसाच्या दिनी अनेक ठिकाणी संगीत प्रेमींसाठी फ्री म्युझिक कॉन्सर्टचे आणि संगीताच्या विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

जगात सर्वात पहिले संगीत दिवस हा फ्रान्स ह्या देशामध्ये २१ जुन १९८२ साली साजरा करण्यात आला होता.फ्रान्स ह्या देशात ह्या दिवसाला फेटे डेला म्युसिकु या नावाने देखील संबोधिले जाते. फ्रान्स ह्या देशामधील फेमस म्युझिक डायरेक्टर मॉरीश फ्लेरोट यांनी तेथील सांस्कृतिक विभागाकरीता हा दिवस साजरा करावयास आरंभ केला होता. दरवर्षी जागतिक संगीत दिवस हा फ्रान्ससमवेत भारतात, ब्रिटनमध्ये, जर्मनीमध्ये, अर्जेंटिना, लक्झेमबर्ग इत्यादी देशांमध्येदेखील दरवर्षी साजरा केला जातो.

मुडफ्रेश करण्यासाठी आपण संगीत ऐकत असतो. जेव्हा आपण रागात असतो नैराश्याने ग्रस्त होऊन ताणतणावात आणि चिंतेत असतो तेव्हा आपण रिलॅक्स होण्याकरीता संगीत ऐकत असतो. बऱ्याच रूग्णालयात आता रूग्णांना बरे करण्यासाठी संगीताचा म्हचजेच म्युझिक थेरपीचा आधार घेतला जातो कारण संगीत ऐकल्याने आपले शरीर हलके होते,आणि आपल्याला एकदम रिलॅक्स फिल होत असते.

कुठलाही आनंदाचा तसेच दुखाचा क्षण साजरा करताना आपण पहिले म्युझिक लावत असतो.मग ती एखाद्याची बर्थ डेची पार्टी असो किंवा एखादी सेलिब्रेशन पार्टी किंवा लग्न समारंभ असो.देवाची आराधना पुजा अर्चना करताना देखील आपण म्युझिकचा वापर करत असतो. खुप जण संगीतामधुन गायन करून संगीताचे श्रवण करून आपल्या भावना व्यक्त करत असतात म्हणजेच आपल्या भावना देखील संगीतादवारेच व्यक्त केल्या जात असतात. काही तज्ञांचे असे म्हणणे आहे की, जर मायग्रेनची समस्या असेल तर अशा वेळी सुमधुर आणि संगीत ऐकल्याने डोकेदुखी कमी होण्यास मदत होते. संगीत ऐकल्याने माईंड शांत व रिलॅक्स होते. (साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### व्यायाम करताना त्वचेची 'अशी' घ्या काळजी!



हल्ली माणसांच्या दिसण्यावरुनच त्यांचे व्यक्तिमत्त्व ठरवले जाते. त्यामुळे त्वचेची काळजी घेणे सर्वच वयोगटातील व्यक्तींसाठी गरजेचे आहे. जर तुम्ही जर वर्कआऊट, व्यायाम करीत असाल तर वर्कआऊटचा तुमच्या शरीर आणि मनावर सारखाच परिणाम होत असतो कारण यामुळे घामावाटे तुमच्या शरीरातील टॉक्सिन्स बाहेर टाकले जातात. तुम्ही व्यायाम करता तेव्हा तुमच्या त्वचेवर घामाचा खूप थर जमा होत असतो. या घामामुळे तुमच्या त्वचेवरील पोअर्स बंद होण्याची शक्यता असते. यासाठीच आम्ही तुमच्यासोबत अशा काही सोप्या टिप्स फॉलो करत आहोत.

वर्कआऊट करण्यापूर्वी मेकअप करू नका : वर्कआऊट करताना त्वचेचे पोअर्स मोकळे होत असतात. अशावेळी या पोअर्सच्या माध्यमातून तुमचा मेकअप त्वचेच्या खोलवर जाऊन सेट होऊ शकतो. असे झाल्यास पिंपल्स, तेलकट त्वचा अशा अनेक त्वचेच्या समस्या निर्माण होऊ शकतात. शिवाय वर्कआऊट करताना तुमच्या त्वचेला ऑक्सिजनचा पूरवठा या पोअर्सच्या माध्यमातून होत असतो, मात्र मेकअपमुळे तुमच्या त्वचेचे पोअर्स बंद राहतात आणि त्वचेला ऑक्सिजनचा पुरवठा कमी होतो.

चेहऱ्याला वारंवार स्पर्श करू नका : व्यायामादरम्यान चेहऱ्याला वारंवार स्पर्श करणे टाळावे. कारण जिम करताना प्रत्येकजण एक्सरसाइज मशीनला हात लावतो. अशा वेळी तुम्हाला इन्फेक्शनचा धोका असू शकतो. त्यामुळे व्यायामा दरम्यान चेहऱ्यावर हात ठेवू नका.

वर्कआऊटनंतर चेहरा स्वच्छ धुवा : ही एक अतिशय सोपी आणि पटकन करण्यासाठी युक्ती आहे. व्यायाम झाल्यावर लगेचच तुमचा चेहरा साध्या पाण्याने स्वच्छ धुवा ज्यामुळे तुमच्या त्वचेवरील घाम आणि त्यातून निर्माण होणारे जीवजंतू नष्ट होतील. व्यायामानंतर यासाठीच अंघोळ करणं फार गरजेचं आहे. पण तुमची जीम घरापासून फार दूर असेल तर घरी जाऊन अंघोळ करण्यापूर्वी चेहरा स्वच्छ धुण्यास विसरू नका.

# एनडीआरएफकडून महाडमध्ये मार्गदर्शन

## आपत्कालीन परिस्थितीतील बचावाचे प्रशिक्षण

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यात १८८ गाव असून त्या मधून ७२ गाव दरड ग्रस्थ आहेत. या पावसाळ्या मध्ये कोणत्याही क्षणी कोणतीही घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही या पाश्वभूमीवर आज तालुक्यातील वीर गावा मध्ये एन डी आर एफ टीम मार्फत पाच गावांना कशा प्रकारे बचाव करावे याचे मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देण्यात आले.

महाड तालुक्यात दरवर्षी पावसाळ्यात दरडीची कोसळण्याच्या घटना घडत असतात.पूर येण्याची शक्यता तर नाकारताच येत नाही. या पाश्वभूमीवर महाड तालुक्यात बचाव कार्यासाठी २८ मे पासूनच एनडीआरएफ च्या टीम ने तळ ठोकला आहे.या टीम मध्ये ३० जवान असून लाईफ जॅकेट,बोट,डी एम कीड



मल्टिपरपज स्टेचर रोप धोडक्यात बचावाची सर्व साधने उपलब्ध आहेत.यंदा महाड तालुक्या त ७२ गावांना दरडीचा धोका असल्याचे शासनाकडून जाहीर करण्यात आले आहे.

या धोकादायक गावांना एन डीआरएफ मार्फत बचावचे प्रशिक्षण आणि मार्गदर्शन सुरु आहे. आज तालुक्यातील वीर गावात मारुती मंदिर या ठिकाणी वीर, टोळ, सापे, दाभोळ आणि कोकरे या पाच गावातील नागरिकांना आपल्या गावा मध्ये आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास बचाव करण्याचे एनडीआरएफचे मुख्य अधिकारी जालेंदर कुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आठ जणांनी या पाच गावातील जवळ पास ४० ते ५० नागरिकांना प्रशिक्षण तसेच मार्गदर्शन केले.

या मध्ये आपत्कालीन वेळी प्रथमोपचार करणे, उपलब्ध साधना नुसार स्ट्रेचर बनवणे,सिपीआर टेकनिकचा वापर,आप त्कालीन वेळी कशा प्रकारे पाण्यातून बाहेर पडणे आणि बांबू पासून बाहेर पडण्याचा पर्याई मार्ग तयार करणे या बाबतीत प्रशिक्षण दिले. या वेळी महाड मंडळ अधिकारी आर एस सुदर्शने,दसगाव तलाठी महेश केसरकर, तलाठी दाभोळ शीतल खंडारे,तलाठी सागर पवार,तलाठी अमोल चव्हाण तसेच पाच गावातील सरपंच ग्रामस्थ ग्रामसेवक अंगणवाडी सेविका, आशा आणि ग्रामपंचायत कर्मचारी हजर होते.

# अतिवृष्टीने कोसळलेल्या झाडांना जीवदान

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली नगरपरिषद हद्दीतील खेळाच्या मैदानावर सामाजिक संस्थेने लावलेले झाडे अतिवृष्टीच्या पाण्यात कोसळली होती ती झाडे सामाजिक कार्यकर्ते व नगरपालिका प्रशासन यांनी पुन्हा सुस्थितीत उभीं करुन त्या झाडांना नव्याने जीवदान दिले आहे. तसेच त्या बदल्यात त्याच परिसरात अजून १०० झाडे लावण्याचा संकल्प पर्यावरण प्रेमी व ग्रामस्थांनी केला आहे. दरम्यान नियोजित खेळाच्या मैदाना सभोवताली जांभूळ, वड, करंज या देशी झाडांची लागवड करुन नवी खोपोली म्हणून उदयास येत असलेल्या डिपी मार्गावर गर्द हिरव्या झाडांनी नटलेला रस्ता करण्याचा चंग हिरवळ निसर्ग प्रेमी युवकांनी केला आहे. तसेच

खोपोली नगरपालीका ही पडलेली झाडे पुन्हा उभी करून अजून ५० झाडे लाऊन घेणार असल्याचे नगरपालीका प्रशासनाने सांगितले.



# मुरूडमधील अशोक लोखंडे विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**मुरुड : प्रतिनिधी**

समाजातील गोर गरीब जनतेमधील मुलांना चांगले शिक्षण घेत असताना पालकांचा शैक्षणिक खर्च वाचून मुलांचे भवितव्य बनावे या उद्दंत हेतूने सामाजिक व शैक्षणिक जाण असणाऱ्या रिचलाईन ग्रुप ए बर्कशायर हॅथवे कंपनी तर्फे पीटसई येथील अशोक ल.लोखंडे विद्यालयातील इयत्ता पाचवी ते दहावी मधील शिक्षण घेत असलेल्या सर्व मुली व मुलांना सुमारे ३०० शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य म्हणजेच कंपास पेटी व प्रत्येक विद्यार्थ्यास सहा वह्या वाटप मोठ्या प्रमाणात करण्यात आले.या कंपनीचे संचालक प्रदीप दिवेकर यांच्या मुख्य उपस्थितीत सर्व शैक्षणिक साहित्याचे वाटप झाले.





कार्यक्रमाच्या सुरुवातीला संचालक प्रदीप दिवेकर यांचे स्वागत संस्थेचे सचिव संजयजी रेडीज यांचे हस्ते शाल व पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.सदरील कार्यक्रमासाठी जे मान्यवर उपस्थित होते त्यांचे स्वागत मुख्याध्यापक अरुण खुळपे यांनी पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.

रिचलाईन ग्रुप ए बर्कशायर हॅथवे कंपनी चे संचालक प्रदीप दिवेकर योनी आपल्या भाषणात सांगितले की,ग्रामीण व दुर्गम भागात एवढी विद्यार्थी संख्या पाहून मला आचार्य होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी शिकणे खूप गरजेचे आहे.शिक्षण घेत असताना मनाशी खूण गाठ बांधणे की उच्च शिक्षित होऊन मोठ्या पदावर जाईन यासाठी येणाऱ्या प्रत्येक प्रस्थतीशी झुंजून यश प्राप्त करण्याची जिद्द ठेवा यश निश्चित मिळणार आहे.माझी मुलगी उच शिक्षित होऊन आज ती

अमेरिकेतील कॅन्सर हॉस्पिटलमध्ये चांगला पदावर कार्यरत असल्याचे सांगितले. आजच्या युगात संगणकाचे ज्ञान असणे गरजेचे आहे. ते ज्ञान घेण्यासाठी इंग्रजी भाषा महत्वाची आहे. मराठी भाषेबरोबरच इंग्रजी येणे खूप आवश्यक आहे.आपले आई-वडील शिकले नसले तरीआपण शिकून मोठे होण्याचे ध्येय ठेवले पाहिजे.सुरुवातीपासूनच अभ्यास करा व यशस्वी व्हा असा गुरुमंत्र त्यांनी दिला.

# कर्जत नगर परिषदेची जुनी इमारत कोसळली

**कर्जत : प्रतिनिधी**

दोन तीन दिवस पडलेल्या मुसळधार पावसामुळे मोडकळीस आलेली कर्जत नगरपरिषदेची कौलरू असलेली जुनी इमारत कोसळली. ही घटना दुपारी तीनच्या सुमारास घडली. ही इमारत कोसळत असताना इमारतीच्या आजूबाजूला बसणाऱ्या फेरीवाल्यांची एकच धावपळ झाली. ही इमारत जागेवरच कोसळल्याने कोणालाही साधे खरचटले सुद्धा नाही.

ही इमारत खूप जुनी आहे. त्यावेळच्या कुलाबा लोकल बोर्डाने ही इमारत बांधली होती. धर्मशाळा अशी नोंद या इमारतीची आहे. येथे सुरुवातीला वाचनालय सुरु केले होते. कर्जत ग्रामपंचायतीचा गाडा येथून हाकला गेला. पहिले सरपंच वकील यशवंत गुप्ते हे सलग पाच वेळा बिनविरोध निवडून आले होते. ते पंचवीस वर्ष सरपंच होते. त्यांच्या सह लक्ष्मीकांत तथा बाबुराव दिवाडकर, लियाड्रॉ सेबास्टियन



डिमेलो, वसंत दगडे, शांतीलाल परमार, तुकाराम सुर्वे, अनंत जोशी आदींनी सरपंच म्हणून येथूनच काम केले होते. कर्जत ग्रामपंचायत मधील कर्जत, मुद्रे ( बुद्रुक ), मुद्रे ( खुर्द ), भिसेगाव आणि गुंडगे ही पाच गावे, दहिवली ग्रामपंचायत आणि शिरसे ग्रामपंचायती मधील आकुर्ले गाव अशी सात गावे मिळून १९९२ साली ऑक्टोबर महिन्यात नगरपरिषद उदयास आली. प्रथम नगराध्यक्ष रमेश चंदन ते अस्मिता मोरे यांनी याच कौलरू इमारतीतून नगरपरिषदेचा कारभार केला होता.

वसंत भोईर यांनी आपल्या कार्यकाळात या इमारतीच्या अर्ध्या भागाची दुरुस्ती करून सभागृह आणि नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्या साठी स्वतंत्र्य दालने तयार केली होती आणि पोट माळा तयार करून काही विभागाच्या कर्मचाऱ्यांची बसण्याची व्यवस्था केली होती.

ऑगस्ट २०१३ मध्ये अस्मिता मोरे नागराध्यक्ष असताना कर्जत नगरपरिषदेच्या नवीन इमारतीची उभारणी करण्यात आली. तेंव्हा पासून ही इमारत रिकामी होती. या इमारतीच्या दुरुस्त केलेल्या भागात आधार केंद्र सुरु आहे.

या इमारतीच्या जागी नवीन इमारत व्हावी. अशी अनेकांची अपेक्षा होती. मात्र तांत्रिक अडचणीमुळे येथे काहीच करता येत नव्हते. येथे नव्याने इमारत बांधताना वाणिज्य गाळे बांधून तीन - चार मजली पार्किंग तयार केल्यास कर्जतकरांची पार्किंगची समस्या मिटेल. कर्जत नगरपरिषदेकडून धोकादायक इमारतींना नोटीसा देउन पाडण्यासाठी सांगतात. मग ही इमारत आत्ता पर्यंत का पडली नाही? असा प्रश्न कर्जतकरांना पडला आहे.

*रोज वाचा 'रामप्रहर'*


## जाहिर निविदा
## ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द
## ता. खालापुर, जि. रायगड

दि. २१/०६/२०२५

सर्व बांधकाम ठेकेदार व पुरवठादार यांस जाहिर निविदाद्वारे कळविण्यात येते की, ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द ता. खालापुर, जि. रायगड यांजकडुन ग्रामपंचायत १५ वा वित्त आयोग व ग्रामनिधी कामाच्या अनुभविक इच्छुक जी.एस.टी. धारक ठेकेदारांकडुन व पुरवठा धारकांकडुन लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी ज्या ठेकेदारांना सदरची कामे करावयाची आहेत व पुरवठाधारकांनी ज्या वस्तु पुरवायचे आहेत त्यांनी आपली निविदा दि. २१/०६/२०२५ पासुन दि. २७/०६/२०२५ पर्यंत सकाळी ठिक १०.०० वाजेपर्यंत समक्ष ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावीत व सदर निविदा दि. २७/०६/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.३० वा. मा. सरपंच व सदस्य व ठेकेदार/पुरवठादार यांच्या उपस्थितीत समक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अगर सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा आधिकार मा, सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | योजनेचे नाव | इसारा रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रामपंचायत हद्दीतील सर्व गाव, वाडी गटार साफसफाई करणे | ७८६४०/- | १५ वा वित्त आयोग बधीत सन२०२५-२६ | ७८६/- | ६ महिने |
| २. | प्रदुषणाचा प्रभाव कमी करणेसाठी झाडे लावा ग्रा.पं. हद्दीत | ५००००/- | १५ वा वित्त आयोग बधीत सन२०२५-२६ | ५००/- | ६ महिने |
| ३. | पथदिव्यासाठी LED ट्यूब ची व्यवस्था करणे | १०००००/- | १५ वा वित्त आयोग बधीत सन२०२५-२६ | १०००/- | ६ महिने |
| ४. | खरेदीसाठी प्लास्टिक पिशव्याएवजी कापडी पिशवीचा वापर | ८००००/- | १५ वा वित्त आयोग बधीत सन२०२५-२६ | ८००/- | ३ महिने |
| ५. | पिण्याच्या पाण्याचे स्त्रोतांचे क्लोरिनीकरण | ८००००/- | १५ वा वित्त आयोग बधीत सन२०२५-२६ | ८००/- | ३ महिने |
| ६. | सामुदायिक शौचालय बांधकाम सुधारणा | ५००००/- | १५ वा वित्त आयोग बधीत सन२०२५-२६ | ५००/- | ३ महिने |
| ७. | पथदिवे बसविणे (बीडखुर्द आदिवासी वाडी / उंबरविरा | ९००००/- | १५ वा वित्त आयोग अबधीत सन२०२५-२६ | ९००/- | ३ महिने |
| ८. | ग्रामपंचायत कार्यालय संगणक प्रिंटर खरेदी | ५००००/- | १५ वा वित्त आयोग अबधीत सन२०२५-२६ | ५००/- | ३ महिने |
| ९ | सौरदिवे बसविणे स्मशानभूमी केळवली/वणी/वांगणी | ५००००/- | १५ वा वित्त आयोग अबधीत सन२०२५-२६ | ५००/- | ३ महिने |
| १०. | बीड तलाव शेजारी निवारा शेड बांधणे | १०००००/- | १५ वा वित्त आयोग अबधीत सन२०२१-२६ | १०००/- | ३ महिने |
| ११. | उपकेंद्र वॉटर फिल्टर बेड पुरवणे व पाण्याची टाकी (१०००) | ४००००/- | १५ वा वित्त आयोग अबधीत सन२०२५-२६ | ४००/- | ३ महिने |
| १२. | ग्रामपंचायत हद्दीत सर्व गटार साफसफाई करणे | ७८६४०/- | १५ वा वित्त आयोग अबधीत सन२०२५- २६ | ७८६/- | ३ महिने |
| १३ | ड्रेनेज बांधकाम (गटार बांधकाम बीडखुर्द) | ८९७००/- | १५ वा वित्त आयोग अबधीत सन२०२५- २६ | ८९७/- | ३ महिने |

**अटी शर्ती :-**

१. सदर कामाची कोरी निविदा दि.२१/०६/२०२५पासून दि.२७/०६/२०२५ पर्यंत सुट्टीचे दिवस वगळून उपलब्ध होतील.
२. निविदे सोबत एक टक्का इसारा रक्कम ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द या नावाने डिमांड ड्राफ्ट स्वरुपात भरल्याची पावती जोडणे आवश्यक आहे किंवा रोखीने ग्रामंपचायत मध्ये सामान्य पावतीने भरणा करावी.
३. निविदा मंजुर झालेल्या ठेकेदाराला ५०० रु. च्या बाँड पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.
४. सदरचे काम पंचायत समितीकडील संबधित तांत्रिक अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली व ग्रामपंचायतीच्या देखरेखेखाली पूर्ण करण्याचे आहे.
५. काम पुर्ण झाल्यावर कामाच्या बिलातुन ५ टक्के सुरक्षा अनामत, २ टक्के जी.एस.टी., २ टक्के आयकर, १ टक्का कामगार कल्याण, १ टक्का कामगार विमा इत्यादी रकम कपात केल्या जातील.
६. ठेकेदार हा अनुभवी व GST धारक असावा.
७. सुरक्षा अनामत रक्कम कामाचा दर्जा पाहुन ६ महिन्याने परत केली जाईल.
८. कामाचे वेळी काही जीवीतहानी झाल्यास त्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.
९. काम सुरु करण्यापुर्वीचे फोटो, काम सुरु असतानाचे फोटो व काम पुर्ण झाल्यानंतरचे फोटो सादर केल्याशिवाय बिलाची रक्कम अदा केली जाणार नाही.
१०. पोस्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाही

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द**



**सिडको**
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेतंर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता.पनवेल, जि.रायगड | | | | | | | | |
| १ | कामोठे १२३ | ११९ | ३६४/९ | ०-३३-६ | ३०० चौ.मी. | भूखंड क्र. १६२, सेक्टर- १४, क्षेत्र ३०० चौ.मी. कामोठे नोड | कै. जनाबाई शालिक पेटकर (मयत) यांचे वारस<br>१.२) सचिन सुधाकर पेटकर,<br>१.३) सुजाता विजय चिपळेकर,<br>१.४) सारीका गुरुनाथ तांबडे,<br>१.५) सपना सुधाकर पेटकर उर्फ सपना दिलीप ठाकूर<br>२) शकुंतला चंद्रकांत म्हात्रे | निरंक |
| २ | खारघर २२८ | खारघर ४४ | ३१४/५ | ०-७-० | ४० चौ.मी. | भूखंड क्र. ६६, सेक्टर- ३०, क्षेत्र ४० चौ.मी. | श्रीमती. द्रौपदी दिनकर धर्णेकर उर्फ द्रुपदा अंबो पाटील | - |
| | | | एकूण क्षेत्र | ०-७-० | | | | |
| ३ | उलवे १०४३ | वहाळ ३१७क | ९२/११ व इतर | ३-९८-८ | ५५५० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र. १९२, सेक्टर- १७, क्षेत्र २५० चौ.मी. | श्रीमती. ताईबाई पांडुरंग राऊत | - |
| | | वहाळ ३२९क | ६९/७ | ०-१२-८ | | | | |
| | | वहाळ २३० | ३८२/१ | ०-१४-० | | | | |
| | | वहाळ ५१८ब | २४६/६ | ०-७-० | | | | |
| | | वहाळ १२७ | ५५/५ | ०-५-७ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निर्दर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन वाटपपत्र करुन देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४.

**अति.मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

सिडको/जनसंपर्क/१२४/२०२५-२६

# नवी मुंबईकरांना सुविधा देण्यासाठी तातडीने मार्ग काढा -मुख्यमंत्री फडणवीस

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



नवी मुंबईतील नागरिकांच्या विविध सुविधांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर आढावा घेतला. नवी मुंबईतील विकास आराखड्यास मंजुरी, करारपद्धतीने कार्यरत प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरुपी सामावून घेणे, गरजेपोटी बांधलेली घरे अधिकृत करणे, नवी मुंबई महापालिकेचा विकास आराखडा मंजूर करणे, नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील विकास शुल्काच्या रक्कमेबाबत तसेच खारघर ते नेरूळ धक्का सागरी मार्ग बेलापूरमधून न घेता सेक्टर ११ बेलापूर मधून विमानतळाला जोडणे आदी मागण्यांबाबत तातडीने मार्ग काढण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नवी मुंबई महापालिका आणि ऐरोली विधानसभा मतदारसंघातील प्रश्नांबाबत आढावा बैठक वर्षा निवासस्थानी झाली. ऐरोली विधानसभेचे आमदार तथा वन मंत्री गणेश नाईक यांच्या विनंतीवरून झालेल्या या बैठकीस वनमंत्री गणेश नाईक, माजी खासदार संजीव नाईक, माजी खासदार कपिल पाटील आदी उपस्थित होते.

नवी मुंबई महानगरपालिकेचा विकास आराखडा महासभेच्या मान्यतेने अंतिम मंजुरीसाठी राज्य शासनाकडे पाठविला असून त्यास लवकरात लवकर मंजुरी द्यावी. महापालिकेने होर्डिंग व फेरीवाला धोरणाला लवकरात लवकर मंजुरी द्यावी. तसेच अशा प्रकारचे धोरण महापालिकास्तरावर मंजूर करण्याबाबत विचार करण्याची सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केली.

बारवी धरणग्रस्तांना ज्या प्रमाणे विविध महापालिकांमध्ये कायमस्वरुपी नोकरी देण्यात आली आहे, त्या प्रमाणेच मोरबे धरण व सिडकोच्या प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरुपी सामावून घेण्यासंदर्भात कालबद्ध आराखडा तयार करावा. ऐरोली जेट्टी चोवीस तास सुरू ठेवणे, शिवडी–न्हावा शेवा प्रकल्प बाधित मच्छिमारांना भरपाई देणे, नवी मुंबईतील गावठाण विस्तारामध्ये गरजेपोटी बांधलेल्या घरांना अधिकृत करणे, सिडकोच्या गृहनिर्माण योजनेतील घरांच्या किमती कमी करणे, नवी मुंबई विमानतळामध्ये स्थानिकांना नोकरी देणे, दगडखाण व क्रशर प्लॉटधारकांना पुनर्वसन म्हणून भूखंड देणे आदी विषयांवर तातडीने मार्ग काढण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले.

खारघर सेक्टर १६ ते नेरूळ जेट्टी या प्रस्तावित सागरी किनारा मार्गातील बेलापूर सेक्टर १५ येथे डबल डेकर रस्ता तयार करता येईल का याचा विचार करावा. तसेच तुर्भे व कोपरखैरणे यांच्यामधील खैरणे गावाजवळ आणखी एक नवीन रेल्वे स्थानक उभारण्यासंदर्भात केंद्रीय रेल्वे मंत्र्यांशी चर्चा करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

शहापूर तालुक्यातील डोळखांब येथील धरणाची उंची वाढविण्यासंदर्भात जलसंपदा विभागाने प्रस्ताव देण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

नवी मुंबईतील नागरिकांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न तातडीने मार्गी लागावेत. घणसोली येथे खुला रंगमंच कला अकादमी मिनी थिएटर बांधणे, मराठी भाषा भवन उभारणीला गती देणे, घणसोली येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीड संकूल उभारणे, तसेच विकास शुल्कामध्ये महानगरापालिकेलाही हिस्सा मिळावा. परमपूज्य गंगानाथ महाराज आर्थिक विकास महामंडळाचे नाव बदलून श्री शिव गोरक्षनाथ आर्थिक विकास महामंडळ करणे, नागरी सुविधांसाठी औद्योगिक वसाहतीमधील भूखंड महापालिकेकडे हस्तांतरित करावेत, आदी विविध मागण्या वन मंत्री नाईक यांनी यावेळी केल्या.या बैठकीस नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलास शिंदे, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल उपस्थित होते.

# नवी मुंबई विमानतळाजवळ प्राण्यांची बेकायदेशीर कत्तल

## उच्च न्यायालयाच्या प्राणी कल्याण समिती सदस्याचा हस्तक्षेप

**नवी मुंबई : बातमीदार**



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ बेकायदेशीर प्राण्यांच्या कत्तलीला एक नवा वळण देत, मुंबई उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या प्राणी कल्याण कायदा देखरेख समितीच्या सदस्याने हस्तक्षेप केला असून पोलिसांना कारवाई करण्याची विनंती केली आहे.

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने विमानतळ अधिकाऱ्यांना बेकायदेशीर कत्तल आणि मटणाची खुली विक्री सुरूच आहे याकडे नॅटकनेक्ट फाउंडेशनने उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार समितीचे मानद सदस्य सूरराज साहा यांचे लक्ष वेधले आहे. साहा यांनी नवी मुंबई पोलिस आयुक्तांना निदर्शनास आणून दिले आहे की ही दुकाने वाढत आहेत आणि 'प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायदा, १९६०, महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ आणि अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६' यातील तरतुदींचे स्पष्ट उल्लंघन केले जात आहे.

मला असे आढळून आले की कच्च्या मांसाच्या कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावली जात नाही, ज्यामुळे अनेक पक्षी उड्डाण क्षेत्राजवळ खाद्यासाठी येतात आणि नवी मुंबई विमानतळावरील विमानांना गंभीर धोका निर्माण होऊ शकतो,' असे त्यांनी नॅटकनेक्टचे संचालक बी. कुमार यांनी डीजीसीएकडे केलेल्या तक्रारीशी सहमती दर्शवत म्हटले आहे.

साहा यांनी या बेकायदेशीर दुकानांवर छापे टाकण्याची ऑफरही दिली आणि पोलिस बळाची विनंती केली. 'प्राणी कल्याण कायद्याचे उल्लंघन तपासण्यासाठी उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या समितीचे सदस्य म्हणून ही आमची जबाबदारी आहे,' असे साहा म्हणाले.

त्यांनी निरीक्षण नोंदवले की, बेकायदेशीर आणि अस्वच्छ कत्तलीमुळे सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरण सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला आहे.नागरी विमान वाहतूक महासंचालक यांनी सांगितले की, कोणत्याही विमानतळाच्या १० किमीच्या परिघात प्राण्यांची कत्तल केली जाऊ नये, असे विमान नियमांचे हे उघड उल्लंघन आहे, असे कुमार यांनी निदर्शनास आणून दिले मांस खुलेआम विकण्याच्या धोक्याविरुद्ध, स्वच्छतेच्या सर्व नियमांना डावलून, तक्रार केली आहे.

# योग दिनानिमित्त वाशीतील सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये विशेष कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

२१ जून या आंतरराष्ट्रीय योग दिनाची संकल्पना यावर्षी 'एक पृथ्वी, एक आरोग्य यासाठी योग' ही असून त्यानुसार केवळ भारतातच नव्हे तर जगातील विविध देशात योगदिन साजरा होत आहे.

भारतीय संस्कृती मधील योगसूत्राद्वारे मानवाच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकासाची संकल्पना स्पष्ट केलेली आहे. याद्वारे आध्यात्मिक उन्नतीही साधता येते. जगभरात स्वीकारले गेलेले भारतीय संस्कृतीतील योगाचे महत्त्व या दिनानिमित्त अधोरेखित केले जाते.

स्वच्छ शहर म्हणून नावाजल्या जाणाऱ्या नवी मुंबई शहरातील आंतरराष्ट्रीय योग दिवस हा स्वच्छता, आरोग्य आणि योग यांचा परस्परसंबंध लक्षात घेऊन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वच्छतेतून आरोग्य – आरोग्यासाठी योग' हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून साजरा करण्यात येत आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिवसाचा विशेष कार्यक्रम सिडको आणि द आर्ट ऑफ लिव्हींग यांच्या सहयोगाने शनिवार दि. २१ जून रोजी सकाळी ६.३० वा. वाशी रेल्वे स्टेशनजवळील सिडको प्रदर्शनी केंद्रामध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आलेला आहे.

तरी स्वच्छता व आरोग्यप्रेमी नवी मुंबईकर नागरिकांनी तसेच विविध संस्था, संघटना, मंडळे यांचे पदाधिकारी व सदस्य, शिक्षक व विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिक यांनी वैयक्तिक व सामाजिक आरोग्य जपणूकीचे महत्व अधोरेखित करण्यासाठी योगासनांतून आरोग्य संवर्धनाचा संदेश प्रसारित करण्यासाठी उपस्थित राहून या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी केले आहे.

# कोपरखैरणेत १५ तास बत्ती गूल

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील कोपरखैरणे भागात गुरुवारी रात्री साडे बारा वाजल्या पासून विज पुरवठा खंडित झाला होता. अखेर पंधरा तासांनी वीज पुरवठा पूर्ववत सुरळीत करण्यात आला.

कोपरखैरणे सेक्टर २० मध्ये गुरुवारी रात्री साडे बारा वाजता खंडित झालेला विज पुरवठा गुरुवारी दुपारी साडे तीन वाजता पूर्ववत झाला. त्यामुळे नागरिकांना प्रचंड उकाडा सहन करावा लागला. त्यातच रात्रभर सुरु असणाऱ्या पावसामुळे नागरिकांना संपूर्ण रात्र अंधारात काढावी लागली. विज नाही तर पाणी नाही त्यामुळे एकीकडे पाणीबाणी आणि दुसरीकडे बत्तीगुल अशा दुहेरी चक्रात पूर्ण रात्र, सकाळ आणि दुपार गेली.

विज पुरवठा खंडित होताच नागरिकांनी महावितरण कार्यलयाशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने नागरिकांना संपूर्ण रात्र अंधारात काढावी लागली. सकाळी महावितरण कार्यालयात तक्रार देण्यात आली.

महावितरणने केबल दुरुस्तीचे काम हाती घेतल्यानंतर दुपारी साडे तीन वाजता विज पुरवठा सुरू करण्यात आला. बत्ती गूलमुळे नागरिकांना उकाड्यासह डासांच्या चाव्याचा त्रास सहन करावा लागला

# विद्यार्थ्यांना बॅग, ड्रेस, वही, पुस्तके वाटप

**उरण : वार्ताहर**

पीएसए इंडिया यांच्या माध्यमातून कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन येथे सोमवारी विद्यार्थ्यांना बॅग्स, ड्रेस, वही, पुस्तकं वाटप करण्यात आली. तसेच लाईट ऑफ लाईम यांनीसुद्धा विद्यार्थी यांचे वर्गरूम सुंदर दिसण्यासाठी आणि त्यांना किट देण्यासाठी मदत केली. याच्या अगोदर काही संस्था फक्त शाळांसाठी शहरी भागात काम करत असत पण पीएसए इंडिया आणि लाईट ऑफ लाईम यांनी ग्रामीण भागातल्या शाळांना भेट देऊन आणि सहकार्य करून योग्य ते दिशा देण्याचे काम केले आहे. पीएसए इंडिया यांनी मुलांसाठी गार्डन, तेथे उपयुक्त असणारी खेळणी, लॅब, वॉशरूम आदी काम करून कोतुकास्पद काम केले आहे.

# जोरदार पावसामुळे शेतकरी धास्तावला : खरीप हंगामातील भात पेरणी धोक्यात

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

गतवर्षीच्या तुलनेत यंदा पावसाला लवकर सुरुवात झाल्याने पेरणी वाया जाण्याचा भीतीने यंदा पावसाला लवकरच सुरुवात झाल्याने पेरणी वाया जाण्याच्या भीतीने शेतकऱ्यांनी सुरुवातीला भात पेरणी केली नाही. तर काही ठिकाणच्या शेतकऱ्यांनी पेरणीला सुरुवात केली असली, तरी तालुक्यात काही ठिकाणी पावसामुळे खरीप हंगामातील भात पेरणीला अद्याप सुरूवात झालेली नाही.

धूळपेरणीचा पर्याय असला तरी ती भर पावसात कशी होणार असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. दरवर्षी मृग नक्षत्रात शेतकरी पेरणी करतात, मात्र यंदा मान्सूनपूर्व पावसाने कहरच केल्याने पेरण्या लांबणीवर पडल्या आहेत. त्यामुळे येथील शेतकरी संकटात सापडला आहे. शेतात साचलेल्या पाण्यामुळे धूळपेरणी करता येत नाही. ज्या शेतकऱ्यांनी भात पेरणी केली आहे. त्या शेतकऱ्यांची भात पेरणी फुकट जाण्याची शक्यता आहे. पाऊस थांबत नसल्यामुळे शेतकरी आता धास्तावले आहेत. महागडी बियाणे खरेदी करून, अनेक ठिकाणच्या शेतकऱ्यांनी भाताची पेरणी केली. मात्र तीन–चार दिवसांपासून कोसळणाऱ्या पावसामुळे कोवळी रोपे पाण्याखाली गेल्याने ती कुजण्याची भीती निर्माण झाली आहे. तर काही शेतकऱ्यांनी भात पेरणी आता दोन दिवसांपूर्वी केली. ती पेरणी फुकट जाण्याची चिंता बळीराजाला लागली आहे.



यावर्षी सततच्या पावसामुळे जमिनीत ओलावा राहिल्याने रोपांच्या उगवण क्षमतेवर परिणाम झाला असून काही ठिकाणी उगवलेली रोपे फार कमकुवत असल्याचे येथील शेतकरी प्रफुल्ल खारपाटील यांनी सांगितले. पाऊस असा सुरू राहिला तर बियाणे कुजून जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. बहुतांशी शेतकऱ्यांना महागडी बियाणे, वाढत्या मजुरीचे दर परवडत नसल्याने भात शेती ओसाड ठेवण्याकडे शेतकऱ्यांचा कल दिसून आहे उरण तालुका हा एकेकाळी भाताचे कोठार म्हणून ओळखला जात असे, परंतु वाढत्या औद्योगिकीकरणामुळे तालुक्यातील भात लागवड क्षेत्र कमी झाले आहे. तालुक्यात आजही पारंपारिक पद्धतीने भातशेती केली जाते, मात्र पावसामुळे काही ठिकाणी खरीप हंगामातील भात पेरणी अद्याप सुरू झालेली नाही. धूळपेरणीसाठी जी उन्हाची उब महत्त्वाची आहे. ती उब शेतात साचलेल्या पाण्यामुळे निर्माण होणे कठीण आहे.

ज्या काही शेतकऱ्यांनी भात पेरणी केली आहे ती पेरणी कुजून गेली आहे. तर काही शेतकऱ्यांनी पेरणीला अजून सुरुवात केली नाही. महत्त्वाचे म्हणजे भात लागवडीसाठी भात रोपेच नसतील तर शेतकऱ्यांना भात शेतीची लागवड करणे अवघड होणार आहे

# दुर्मिळ हिमोफिलियाने ग्रस्त २८ वर्षीय महिलेने सुरक्षितपणे बाळाला दिला जन्म

**नवी मुंबई,: रामप्रहर वृत्त**




गुजरातमधील एका छोट्या शहरात राहणाऱ्या २८ वर्षीय नाझनी खानसाठी मातृत्व हे एक अशक्य स्वप्न बनले होते. दोन गर्भपातानंतर, पुन्हा गर्भवती होण्याची फारशी आशा उरली नव्हती, अशात त्यांना पुन्हा दिवस गेले. पण त्यांच्या या आनंदावर एका भयानक वास्तवाची काळी सावली पडली: नाझनी यांना टाइप ३ हिमोफिलिया असल्याचे निदान झाले. हा जगातील सर्वात दुर्मिळ रक्तस्त्राव विकारांपैकी एक आहे, जो १०,लाख महिलांपैकी १ पेक्षा कमी महिलांना होतो.

हाआजार महिलांसाठी जीवघेणा ठरू शकतो, विशेषतः गर्भधारणेदरम्यान आणि बाळंतपणादरम्यान. रक्त गोठवण्याच्या घटकांची पातळी कमालीची कमी असल्याने, शरीरातील लहानशी दुखापत किंवा बदल यामुळे देखील अनियंत्रित रक्तस्त्राव होऊ शकतो.सातव्या महिन्यात, नाझनीला सतत रक्तस्त्राव होऊ लागला, ज्यामुळे केवळ तिच्या गर्भधारणेलाच नव्हे तर तिच्या जीवालाही धोका निर्माण झाला. उपचारांसाठी मल्टी–डिसिप्लिनरी, संसाधन–केंद्रित दृष्टिकोन आवश्यक होता.

नवी मुंबईतील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलमधील बीएमटी आणि सेल्युलर थेरपी हेमॅटो–ऑन्कोलॉजिस्ट, कन्सल्टन्ट, डॉ. कुणाल गोयल यांनी या प्रकरणाची जबाबदारी घेतली. त्यांनी माहिती दिली, रक्तस्त्राव ताबडतोब थांबवणे इतकेच नव्हे तर गर्भधारणा सुरक्षितपणे पूर्ण करणे हे आमच्यासमोरील आव्हान होते. गर्भधारणेचा प्रत्येक आठवडा धोकादायक होता. आम्ही तिच्या तब्येतीवर बारकाईने लक्ष ठेवले, गायनाकोलॉजी आणि क्रिटिकल केअर टीमसोबत काम करून सर्व घटकांची काळजी घेतली. नवव्या महिन्यात, आम्ही बॅकअप व्हाईल्स, आयसीयू तयारी आणि संपूर्ण टीमच्या समन्वयाने प्रसूतीचे काळजीपूर्वक नियोजन केले. हा एक अतिशय उच्च–जोखीम केस होता, परंतु नियोजनासह, आम्ही सर्वोत्तम शक्य परिणाम साध्य केला, आई आणि बाळ दोघांचीही तब्येत उत्तम आहे.

आर्थिक अडचणींमुळे गुंतागुंत वाढली. कुटुंबाला विशेष उपचार किंवा महागडे फॅक्टर कॉन्सन्ट्रेट्स परवडत नव्हते. रुग्णालयाने आर्थिक निधी मिळवण्याकरता मार्गदर्शन व साहाय्य केले आणि अंतर्गत संसाधनांचा वापर करून, पथकाने कुटुंबावर भार न टाकता उपचार करता येतील याची काळजी घेतली.


आज, नाझनी तिच्या नवजात बाळासह घरी परतली आहे, दोघांच्याही तब्येती उत्तम आहेत. तिची केस हिमोफिलिया टाईप ३ रुग्णांमध्ये उच्च–जोखीम असलेल्या गर्भधारणेचे व्यवस्थापन करण्यासाठी एक बेंचमार्क मानला जात आहे, ज्यामध्ये तज्ञ कमी आहेत.नाझनी खान म्हणाल्या, दोन गर्भपातानंतर, आम्ही जवळजवळ आशा सोडून दिली होती.

# पाली भाषा पदवी शिक्षण शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घ्या

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

खारघर येथील सत्यागह महाविद्यालयाच्या पाली – संस्कृत विभाग, बौद्धं अभ्यास विभाग आणि पाली भाषा प्रमोशन फाऊंडेशन यांच्या सयुक्त विद्यमाने सत्याग्रह महाविद्यालयात पाली – संस्कृत भाषा एच्छिक विषय घेऊन पदवी शिक्षण पूर्ण करणाऱ्या इच्छुक विद्यार्थांना प्रोत्साहनपर वार्षिक रुपये पाच हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात येणार असल्याचे सत्याग्रह कॉलेजचे प्राचार्य प्रा. डॉ. जी. के. डोंगरगांवकर यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## खारघरच्या सत्याग्रह महाविद्यालयाकडून इच्छुकांना आवाहन



येत्या चालू शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये पाली विषय घेणार्या प्रत्येक विद्यार्थ्याला विना अट प्रवेश दिला जाणार आहे.प्रवेश घेणाऱ्या मुंबई बाहेरील विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सोय उपलब्ध आहे. मुंबई विद्यापीठ आकारित असलेल्या एकूण शुल्कपैकी ५० टक्के शुल्क महाविद्यालय देणार आहे. ही सवलत आणि शिष्यवृत्तीसाठी संवर्ग उत्पन्न अथवा अन्य अट नाही. प्रवेश पात्र बीए प्रथम , द्वितीय आणि तृतीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यासाठी ही सवलत लागू आहे. शासनाच्या नवीन धोरणा नुसार अन्य विद्याशाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याला अतिरिक्त बीए पाली विषय घेऊन २ पदव्या एकाच वेळेत पूर्ण करण्याची संधी उपलब्ध आहे.

खारघर येथील सत्याग्रह महाविद्यालय सेक्टर –७ खारघर येथे सायंकाळी ६ ते ८ आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी आणि शनिवार आणि रविवार दुपारी सदरचे वर्ग सुरू असणार आहेत. या कोर्सला प्रवेश घेणाऱ्याला भारत सरकारच्या अनुसूचित जाती–जमाती, ओबीसी, आर्थिक दृष्ट्या कमकुवत तसेच व्हीजेएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, दीनदयाल उपाध्याय स्वयं आधार योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना, राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना याचा लाभ घेता येणार आहे.

पात्र इच्छुक विद्यार्थ्याने प्रवेशासाठी कार्यालयीन वेळात पाली भाषा विभाग प्रमुख प्रा. सतीश पवार, सत्याग्रह महाविद्यालय सेक्टर ७ खारघर पोलिस ठाणे, ३ स्टार हॉटेल जवळ खारघर, येथे व्हॉट्सअॅप मो नं ९१३९५०९३५५, ईमेल - satyagarahacollege@yahoo.com / satishpawar8992@gmail.com,gdongargaonkar@gmail.com , या वर नोंदणी आणि संपर्क करा, असे आवाहन प्रा. डॉ. जि . के डोंगरगावकर यांनी कळविले आहे.

# श्रीवर्धनमध्ये ठाकरे गटाला धक्का

## माजी आमदार तुकाराम सुर्वे राष्ट्रवादीत




**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मोठा धक्का बसला आहे. माजी आमदार तुकाराम सुर्वे यांच्यासह श्रीवर्धन तालुका संपर्कप्रमुख सुजित तांदळेकर आणि माजी पंचायत समिती सभापती बाबुराव चोरगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. या घडामोडींमुळे श्रीवर्धनमधील राजकीय समीकरणे बदलली आहेत.

मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयात झालेल्या सोहळ्यात राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आणि रायगड लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत तिन्ही नेत्यांनी पक्षप्रवेश केला. खासदार तटकरे यांच्या कार्यप्रणालीने प्रभावित होऊन या नेत्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला, असे सांगितले.

२००९नंतर श्रीवर्धन मतदारसंघात विकास कामांची गती वाढली, मात्र गेल्या काही वर्षांत ठाकरे गट अडचणीत सापडला आहे. अनेक जुने, मातब्बर नेते पक्षातून बाहेर पडू लागले असून निष्ठावंतांचा एक छोटा गटच उरला आहे. अशा परिस्थितीत तुकाराम सुर्वे, सुजित तांदळेकर आणि बाबुराव चोरगे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश हे भविष्यातील मोठ्या राजकीय बदलांचे संकेत मानले जात आहेत.

श्रीवर्धन तालुक्यात सुमारे ७० टक्के मतदारसंख्या असलेल्या कुणबी समाजाचे अनेक प्रभावी नेते आता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहेत. त्यामुळे तालुक्याचे नेतृत्वही आता हळूहळू कुणबी समाजाकडे झुकते आहे, अशी चर्चा जोरात सुरू आहे.

या पक्षप्रवेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला आगामी पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये स्पष्ट फायदा होणार असल्याचे मत स्थानिक राजकीय विश्लेषक आणि कार्यकर्ते व्यक्त करत आहेत. विकासाभिमुख विचारसरणी असलेल्या या नव्या नेतृत्वामुळे पक्ष अधिक मजबूत होईल, असा विश्वास पक्षश्रेष्ठींनीही व्यक्त केला आहे.

# खारपाडा घरफोडी प्रकरणातील आरोपीला मुद्देमालासह अटक



**पेण : प्रतिनिधी**

दादर सागरी पोलीस ठाणे हद्दीत फिर्यादी सत्यजित वाजपेयी (रा. खारपाडा ता. पेण) यांच्या राहत्या घरातून चोरट्याने घरफोडी केली होती. पोलिसांनी आरोपीला अटक करून त्याच्याकडून मुद्देमाल हस्तगत केला आहे.

चोरट्याने सोन्याचे दागिने व रोख रक्कम ही फिर्यादी यांच्या रूमच्या उघड्या खिडकीच्या आत प्रवेश करून कपाटातून घरफोडी करून चोरून नेली होती. याबाबत दादर सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार ठाकूर, हवालदार अतिश पाटील व नंदन पाटील यांनी गुन्ह्याचा तपास करून गोपनीय माहितीनुसार गुन्ह्यातील आरोपी गुड्डू हरेराम सिंग (वय १८) या आरोपीचा शोध घेऊन त्याच्याकडे सखोल चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केले.

आरोपीस अटक करून त्याच्याकडून ३,१५,००० रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र, ९०,००० रुपये किमतीचे सोन्याचे नेकलेस, १००० रुपये किमतीचे पिवळसर धातूचा नेकलेस आणि ४,२०० रोख रक्कम असा एकूण चार लाख १० हजार २०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

दादर पोलीस निरीक्षक संजयकुमार ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने ही कामगिरी केली. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# मध्य रेल्वेच्या १२ कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापकांचा पुरस्कार



**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्म वीर मीना यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे मंगळवारी झालेल्या कार्यक्रमात मुंबई विभागातील ६, पुणे विभागातील ३, भुसावळ विभागातील २ आणि नागपूर विभागातील १ अशा एकूण १२ कर्मचाऱ्यांना सुरक्षा पुरस्काराने सन्मानित केले.

कर्तव्या दरम्यान दक्षता दाखवून संभाव्य अपघात टाळण्यामध्ये व रेल्वेच्या सुरक्षित रेल्वे संचालनात मोलाचे योगदान दिल्याबद्दल हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रत्येक पुरस्कारात पदक, गौरव प्रमाणपत्र, उत्कृष्ट सुरक्षा कार्याचे प्रशस्तीपत्र व २००० रोख रक्कम देण्यात आली.

महाव्यवस्थापक पुरस्कारप्राप्त कर्मचाऱ्यां मध्ये मुंबई विभागात विक्की कुमार, वरिष्ठ ट्रेन मॅनेजर पनवेल, चांगदेव एस. डुंगे, मास्टर क्राफ्ट्समन कुर्ला कारशेड, मित्तल नरेंद्र गड्लिंग, सहाय्यक लोको पायलट कुर्ला, संदीप नाना भालशंकर, मास्टर क्राफ्ट्समन (सी अँड डब्ल्यू) इगतपुरी, निलेश शिंदे, कनिष्ठ अभियंता (सी अँड डब्ल्यू) कलंबोली, चंदन कुमार, ट्रॅक मेंटेनर विद्याविहार, पुणे विभागात अभिषेक लोहिया, डेप्युटी स्टेशन मॅनेजर निम्बळक, अभिचंद्र यादव, लोको पायलट (मालगाडी) लोणावळा, संदीप पवार, निरीक्षक, रेल्वे संरक्षण बल पुणे, भुसावळ विभागात उदय प्रताप पटेल, वरिष्ठ विभाग अभियंता (पीवे) बोडवड, दर्शन राजेश चंदन, पॉईंट्समन गायगाव, नागपूर विभागात एम. पी. देव, लोको पायलट (मेल) नागपूर यांना सन्मानित करण्यात आले.

या वेळी अतिरिक्त महाव्यवस्थापक प्रतीक गोस्वामी, प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी चंद्रकिशोर प्रसाद यांच्यासह अन्य प्रधान विभाग प्रमुख व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# साळावच्या जिंदल विद्यामंदिरात लंडन ट्रिनिटी कॉलेजची जीइएसइ परीक्षा




**मुरूड : प्रतिनिधी**

जिंदल विद्या मंदिर साळाव यांनी २०२४-२५ या शैक्षणिक सत्रात ट्रिनिटी कॉलेज लंडनच्या जीइएसइ म्हणजेच सर्वोत्कृष्ट इंग्रजी बोलता यावे यासाठी इंग्रजी बोलण्याचे कौशल्य स्तर उंचावण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील परीक्षेचे यशस्वी आयोजन करून विद्यार्थ्यांच्या संवाद कौशल्यांना नवी दिशा देण्याचे काम या हायस्कूल ने केले आहे.

ही परीक्षा विद्यार्थ्यांच्या प्रभावी इंग्रजी बोलण्याच्या क्षमतेचे मूल्यांकन यामध्ये करण्यात आले. इयत्ता १ ते ५ या वर्गांतील २८ विद्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग घेतला. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी अत्यंत आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जात उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या परीक्षेत १७ विद्यार्थ्यांनी विशिष्टता ग्रेड ए तर १० विद्यार्थ्यांनी ग्रेड बी, तर एक विद्यार्थ्याने उत्तीर्ण झाला आहे.

या परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ बोलण्याचे व्याकरणीय ज्ञान नव्हे, तर वास्तविक जीवनातील संवाद कौशल्यांचा विकास झाला. अशा स्वरूपाच्या मूल्यांकनामुळे भविष्यातील विदेशी शिक्षण, शिष्यवृत्ती, व्हिसा प्रक्रिया आणि आंतरराष्ट्रीय संवादासाठी उपयुक्त ठरणारा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाला आहे.

उपक्रमास मुख्याध्यापक मुकेश ठाकूर, उपमुख्याध्यापक मंगेश बमनोटे, समन्वयक अनुजा साळुंखे यांच्यासह प्रशिक्षण देणाऱ्या मंजिरी लेले, सबा रिजवान पठवी यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभले.

# जीवनात स्वास्थ्यासाठी योगसाधना करा -डॉ. श्रेयांश

**चौक : प्रतिनिधी**

योगा होगा तो सब होगा. आपला मेंदू जागेवर असतो, पण मन फिरत असते. त्यासाठी योगा करणे अतिशय उपयुक्त आहे. त्यामुळे जीवनात स्वास्थ निर्माण होण्यासाठी योगा करा, असे आवाहन डॉ. निवेदिता श्रेयांश यांनी केले आहे.

पिल्लई ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन यांनी कॉमनवेल्थ युथ कौन्सिल ही केंद्र सरकारची अधिकृत प्रतिनिधी संस्था यांच्या बरोबर आंतरराष्ट्रीय पातळीवर युवा-नेतृत्वाच्या कल्याणासाठी आणि त्यांच्यासाठी विकास मूल्य,सहकार्य, क्षमता निर्माण, कौशल्य वाढ, खेळ, नागरी सहभाग यासाठी सामंजस करार केला, त्यानिमित्ताने रसायनी येथील शैक्षणिक संस्थेच्या सभागृहात योगा दिनाचे औचित्य साधून विद्यार्थी यांच्यासाठी योगा शिबिराचे आयोजन केले होते,

या प्रसंगी पिल्लई ग्रुप ऑफ इन्स्टिटच्यूशनच्या जनसंपर्क अधिकारी डॉ निवेदिता श्रेयांश बोलत होत्या.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योगाला आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळून जगात नाव लौकिक मिळवून दिल्याचे सांगून योगाचे महत्व विषद केले. आहे.योगासन केल्याने शारीरिक आणि मानसिक आरोग्याला अनेक फायदे मिळतात. यामुळे शरीरातील लवचिकता वाढते, ताकद वाढते, तणाव कमी होतो, तसेच एकाग्रता आणि मानसिक शांती लाभते. असे डॉ. निवेदिता श्रेयांश यांनी सांगितले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते,यावेळी योगाची प्रात्यक्षिक सादर करून उपस्थित यांच्याकडून करून घेतली.

# दामिनी पथक पुन्हा कार्यरत व्हावे

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

शहरातील महिलांच्या सुरक्षेचा कणा ठरलेलं दामिनी पथक आज श्रीवर्धन पोलीस ठाण्यात निष्क्रिय अवस्थेत आहे. विद्यार्थिनी, तरुणी आणि महिलांवर सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या छेडछाडीच्या घटनांमध्ये वाढ होत असताना, हे पथक पुन्हा कार्यरत व्हावे, अशी जोरदार मागणी श्रीवर्धनमधून केली जात आहे.

२०१५ साली श्रीवर्धन पोलीस ठाण्यात महिलांच्या सुरक्षेसाठी दामिनी पथक स्थापन करण्यात आले होते. प्रारंभी दोन महिला पोलीस या पथकासाठी नेमण्यात आल्या. त्यांचे कार्य दोन स्तरांवर होते – शहरात पोलीस गणवेशात गस्त घालणे आणि दुचाकीवरून संवेदनशील भागांत गस्त घालून महिलांच्या सुरक्षिततेसाठी सतर्कता ठेवणे.

या पथकाने केवळ गस्त घालून थांबले नाही, तर शाळा, महाविद्यालयांत जाऊन विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे मार्गदर्शन, महिलांशी संवाद, ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या



समजून घेणे, बैठका घेऊन त्यांचे मनोबल वाढवणे अशा विविध उपक्रमांद्वारे सामाजिक जनजागृती केली. त्यामुळे महिलांना आणि ज्येष्ठांना या पथकाचा आधार लाभत होता.

कोरोना महामारीच्या काळात पथकातील एका महिला कर्मचाऱ्याची बदली झाली. उर्वरित एकाच कर्मचाऱ्याच्या खांद्यावर जबाबदारी राहिली होती. डिसेंबर २०२४ अखेरीस तिच्याही बदलीमुळे दामिनी पथक पूर्णतः रिक्त झाले. परिणामी, सध्या शहरात महिला सुरक्षेचा महत्त्वाचा आधारच हरवला आहे. सध्या शाळा, कॉलेज,

**कर्मचारी हस्तांतरण प्रक्रिया सुरू आहेत, तर उर्वरित हस्तांतरण प्रक्रिया पुढील आठवड्यात पूर्ण होईल. त्यानंतर निर्भया पथके सक्रिय केली जातील.**

**-आंचल दलाल,**
**रायगड पोलीस अधीक्षक**

बसस्थानके यांसारख्या ठिकाणी महिलांना पुन्हा असुरक्षिततेचा सामना करावा लागत आहे. त्यात वाढती गर्दी, युवकांकडून होणारी छेडछाड यामुळे पालक आणि महिला वर्ग अस्वस्थ झाले आहेत. त्यामुळे दामिनी पथक लवकरात लवकर पुन्हा कार्यान्वित करावे, अशी मागणी जोर धरत आहे.

शहरातील अनेक महिला सामाजिक संघटना, ज्येष्ठ नागरिक, पालक मंडळ यांच्याकडून श्रीवर्धन पोलीस ठाण्याला निवेदने दिली जात आहेत. पोलीस प्रशासनानेही या मागणीची दखल घ्यावी आणि महिलांच्या सुरक्षेसाठी तातडीने महिला कर्मचारी नियुक्त करून पथक सक्रिय करावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

# पेण पालिका शाळांत विद्यार्थ्यांचे स्वागत

**पेण :** नवीन शैक्षणिक वर्षांत पेण न.प. च्या शाळामंध्ये मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी उपस्थित राहून बालगोपाळांचे स्वागत केले. यावेळी मुख्याधिकारी यांच्या हस्ते नवीन शैक्षणिक वर्षात शासनातर्फे आलेले पाठ्यपुस्तके, गणवेश तसेच गोड खाऊ, शूज दोन जोडे सॉक्स याचे वितरण करण्यात आले. या वेळी शिक्षक, विद्यार्थी, पालक यांच्यासह शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, कार्यालयीन लिपिक श्रीमती साधना कांबळे उपस्थित होत्या. यावेळी शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी संगीता माने यांनी नवीन शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.



# नेरळ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील ७० वर्षांची परंपरा असलेल्या नेरळचा राजा या नेरळ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची सामाजिक बांधिलकी नेहमी दिसून येत असते. या वर्षी या मंडळाच्या वतीने आणि एच डी एफ सी सिक्युरिटी यांच्या माध्यमातून गरजू आणि गरीब शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.



दरवर्षी सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या नेरळ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने यावर्षी देखील सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. या मंडळाच्या माध्यमातून नेरळ गाव तसेच परिसरातील विद्यार्थ्यांना मदत करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. नेरळ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळासोबत एच डी एफ सी सिक्युरिटीज यांच्या शैक्षणिक विकास उपक्रम अंतर्गत आणि माध्यमातून अनेक उपक्रम राबविले जातात. त्यात नेरळ येथील साने हॉल मध्ये नेरळचे राजा मित्र परिवाराकडून गरजू विद्यार्थ्यांना बॅग भेट देण्यात आल्या. साधारण १०० विद्यार्थ्यांना बॅग वाटप कार्यक्रम करण्यात आला. याप्रसंगी मंडळाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

गरजू विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, उद्योजक राजा वलेचा, माजी ग्रामपंचायत सदस्य जयवंत साळुंके, माजी उपसरपंच केतन पोतदार, संतोष पेरणे विशाल साळुंके, अशुतोष गडकरी, शशिकांत भोईर, चिराग गुप्ता, श्याम कडव, आशिष सुर्वे, आदित्य यादव, यातून यादव, राहुल कालेकर, दीप देशमुख, रुपेश दाभणे, राहुल भाटकर, प्रतीक भिसे, आशिष जोशी, ग्रामपंचायत माजी सदस्य राजेश मिरकुटे आदी उपस्थित होते.

# १० हजार रोप लागवडीचा संकल्प

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून रसायनी पाताळगंगा या परिसरातील बिर्ला कार्बन इंडिया प्रा ली पाताळगंगा, प्रसोल केमिकल लीमीटेड व जिंदाल स्टेनलेस स्टीलवे वाशिवली रसायनी पाताळगंगा यांचा मदतीने लोहाप ते चौक रोड, वाशिवली ते बोरिवली, लोहाप ते माजगाव येथील रस्त्याच्या बाजूला वृक्ष लागवड गुरुवार दि. १९ जून २०२५ रोजी करण्यात आले.

त्या वेळी बिर्ला कार्बन इंडिया प्रा. लीमीटेड मॅनेजर निखिल भामरे, जिंदाल स्टेनलेस स्टीलचे वाशिवली येथील जनरल मॅनेजर विशाल सक्सेना, प्रसोल केमिकल ली. खोपोली येतील योगेश पाटील , महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक अधिकारी उत्तम माने साहेब, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष अरुण गोविंद जाधव, लक्ष्मण मोरे बिर्ला कार्बन इंडिया प्रा ली. नीलेश जाधव, रोहित इंगळे, दीपक फाटे पिल्लेज महाविद्यालय शिक्षिका कलावती उपाध्याय ,अनिता म्हात्रे व महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.



# वेणगाव-कर्जत राज्यमार्गावरील काँक्रीटीकरण अंतिम टप्प्यात



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात असलेल्या कल्याण-कर्जत राज्यमार्गावरील चिंचवली-कडाव-तांबस-जांभिवली-वेणगाव-दहिवली-कोंदिवडे या राज्यमार्ग रस्त्यावर वेणगाव पासून कर्जत नगरपरिषद हद्दीमधील दहिवली गावापर्यंत काँक्रीटीकरण करण्यात येत आहे. या रस्त्यावरील काँक्रीटीकरण कामामुळे हा रस्ता सुसाट होणार आहे.

कर्जत तालुक्यातील चिंचवली ते कोंदिवडे हा राज्य मार्ग कर्जत तालुक्यातील मोठा भाग जोडणारा समजला जातो. या राज्य मार्ग रस्त्यावरील वेणगाव हे गाव कर्जत शहराला लागून असलेले गाव आणि त्यामुळे या गावाकडे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतली आहे. या रस्त्यावर सध्या वेगाने काँक्रिटीकरणाचे काम सुरु आहे. याच रस्त्यावर मॅगसेसे अवॉर्ड विजेते डॉ भरत वाटवाणी यांचे श्रद्धा पुनर्वसन केंद्र देखील आहे. तसेच पेशवेकालीन महालक्ष्मी मंदिर याच रस्त्यावर असल्याने कर्जत शहरातील दहिवली भागातून वेणगाव कडे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे काम सुरु आहे.

# ‘विदर्भ कन्या’ दिव्या देशमुखचा डंका

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केले विशेष कौतुक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विदर्भातील प्रतिभावंत बुद्धिबळपटू दिव्या देशमुख हिने लंडन येथील जागतिक ब्लिट्झ बुद्धिबळ चॅम्पियनशिप स्पर्धेत चीनच्या नंबर वन हू यिफान हिला शह देत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तिच्या या कामगिरीबद्दल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खास पोस्टच्या माध्यमातून युवा बुद्धिबळपटूची पाठ थोपटली आहे.

डब्ल्यूआर बुद्धिबळ संघाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या यिफान हिने राउंड-रॉबिन सेमीफायनल लढतीत दिव्याला शह दिला होता, पण दुसऱ्या फेरीत मराठमोळ्या दिव्या देशमुख हिने दमदार कमबॅक करत पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळताना जागतिक





बुद्धिबळ क्रमवारीत अव्वलस्थानावर विराजमान असलेल्या होउ यिफान हिला पराभूत करून दाखवले.

१८ वर्षीय दिव्या देशमुखच्या दिमाखदार कामगिरीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युवा आणि प्रतिभावंत बुद्धिबळपटूचे कौतुक केले आहे. पंतप्रधानांनी एक्स अकाउंटवरुन एक खास पोस्ट शेअर केलीये. यात त्यांनी लिहिलंय की, लंडन येथील जागतिक ब्लिट्झ बुद्धिबळ चॅम्पियनशिप स्पर्धेतील सेमीफायनलमध्ये जगातील नंबर वन खेळाडू हू यिफानला पराभूत करणाऱ्या दिव्याचे खूप खूप अभिनंदन! तिचे हे यश धैर्य आणि दृढ संकल्पाचे एक उत्तम उदाहरण आहे. युवा खेळाडूंनाही यामुळे प्रेरणा मिळेल. भविष्यातील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा, अशा शब्दांत त्यांनी विदर्भाच्या लेकीला शाब्बासकी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पोस्टवर दिव्या देशमुख हिनेही रिप्लाय दिला आहे. याशिवाय पीटीआयशी संवाद साधताना तिने पंतप्रधानांचे शब्द हे प्रेरणादायी असल्याचे म्हटले आहे.

# श्रीलंकेचे बांगलादेशला सडेतोड प्रत्युत्तर

## पाथुम निसंकाचे शानदार शतक

**गॅले : वृत्तसंस्था**



ज्या खेळाडूचे वडील एके काळी मैदानात साफसफाईचे काम करायचे आणि आई मंदिराबाहेर फुले विकायची, त्याच पाथुम निसंकाने श्रीलंकेसाठी क्रिकेटच्या मैदानावर एक मोठी कामगिरी केली आहे. निसंकाने गॅले येथे सुरू असलेल्या बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटीच्या पहिल्या डावात आक्रमक फलंदाजी करताना शानदार शतक झळकावले. त्याने १३६ चेंडूत शतकी मजल गाठली. यादरम्यान त्याने १३ चौकार आणि एक षटकार ठोकला.

गॅले कसोटीच्या पहिल्या डावात बांगलादेशने ४९५ धावांचा डोंगर उभारला होता. याला प्रत्युत्तर देताना श्रीलंकेनेही जोरदार सुरुवात केली. श्रीलंकेचा पहिला गडी लाहिरू उडारा ४७ धावांवर बाद झाला, पण त्यानंतर अनुभवी फलंदाज दिनेश चंडिमलच्या साथीने पाथुम निसंकाने शतकी भागीदारी रचत श्रीलंकेचा डाव सावरला. या दोन्ही फलंदाजांनी सुरुवातीला ८३ चेंडूंमध्ये ५० धावांची भागीदारी केली.

निसंकाने त्याचे अर्धशतक ८८ चेंडूंमध्ये पूर्ण केले. अर्धशतकानंतर अधिक आक्रमक पवित्रा घेत त्याने केवळ १३६ चेंडूंमध्ये शतक पूर्ण केले. दुसरीकडे चंडिमलनेही ९९ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. या जोडीने श्रीलंकेची धावसंख्या २०० धावांच्या पुढे नेण्यात मोलाचे योगदान दिले.

निसंकाने कसोटी कारकिर्दीतील तिसरे शतक झळकावले. विशेष बाब म्हणजे त्याने ही तिन्ही शतके वेगवेगळ्या फलंदाजी क्रमावर खेळताना झळकावली आहेत. श्रीलंकेच्या भूमीवरील त्याचे हे पहिलेच कसोटी शतक आहे. यापूर्वी त्याला मायदेशात कसोटी शतक नोंदवता आले नव्हते. त्यामुळे हे शतक त्याच्यासाठी आणि श्रीलंकेच्या क्रिकेटसाठी विशेष महत्त्वाचे आहे. या खेळीदरम्यान त्याने त्याच्या कसोटी कारकिर्दीतील एक हजार धावांचा महत्त्वपूर्ण टप्पा ओलांडला.

या सामन्यात बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना मोठी धावसंख्या उभारली होती. बांगलादेशचा कर्णधार नजमुल हसन शांतो (१४८ धावा) आणि अनुभवी मुशफिकुर रहीम (१६३ धावा) यांनी शानदार शतके झळकावली. लिटन दासनेही ९० धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. या फलंदाजांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे बांगलादेशचा संघ पहिल्या डावात ४९५ धावांपर्यंत मजल मारू शकला.

# राष्ट्रीय वुशू स्पर्धेत ऋषिकेश मालोरेला सुवर्णपदक




**माणगाव : प्रतिनिधी**

राजस्थानची राजधानी जयपूर येथे झालेल्या ३४व्या वरिष्ठ राष्ट्रीय वुशू स्पर्धेत माणगाव येथील शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारप्राप्त खेळाडू ऋषिकेश पुंडलिक मालोरे याने सुवर्णपदक पटकाविले आहे.

ऋषिकेश हा न्हावे गावचा सुपुत्र असून वुशू खेळात तालुका, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवर विशेष चमक दाखवत आहे. जयपूर येथे नुकतेच ३४व्या वरिष्ठ राष्ट्रीय वुशू स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत उत्कृष्ट असा खेळ सादर करून ऋषिकेशने सुवर्णपदक जिंकेल आणि माणगाव तालुक्यासह रायगड जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर उंचावले. त्याचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# अहमदाबाद दुर्घटनेतील मृतांना भारत-इंग्लंड कसोटीत श्रद्धांजली

**लीडस् : वृत्तसंस्था**

भारतीय संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर असून शुक्रवार (दि. २०)पासून इंग्लंडविरुद्ध पहिल्या कसोटी सामन्याला सुरुवात झाली. दरम्यान, दोन्ही संघांच्या खेळाडूंनी अहमदाबाद विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली वाहिली.

पहिल्या सामन्यात नाणेफेक जिंकून इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स याने पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या सामन्याला सुरुवात होण्याआधी दोन्ही संघातील खेळाडूंनी अहमदाबाद येथील विमान अपघातात जीव गमावलेल्या लोकांना श्रद्धांजली वाहिली. यासाठी दोन्ही संघातील खेळाडूंनी एका मिनिटांचे मौन बाळगले. एवढेच नाही तर खेळाडू व मैदानातील पंच दंडावर काळ्या रंगाची पट्टी घालून मैदानात उतरल्याचे पहायला मिळाले.

गुजरातची राजधानी अहमदाबाद येथून इंग्लंडची राजधानी लंडनच्या दिशेने झेपावल्यावर एअर इंडियाचे विमान कोसळल्याची दुर्घटना १२ जून रोजी घडली होती. भारत-इंग्लंड यांच्यातील कसोटी सामन्याला सुरुवात होण्याआधी या दुर्घटनेत प्राण गमावलेल्या लोकांना श्रद्धांजली वाहण्यात आली.



## ऑलिम्पिक दिनानिमित्त सोमवारी पुण्यात दौड, खेळाडूंचा गौरव आणि क्रीडा प्रात्यक्षिके

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या वतीने जागतिक ऑलिम्पिक दिनानिमित्त सोमवारी (दि. २३) पुण्यात ऑलिम्पिक दौड, प्रात्यक्षिकांचे प्रदर्शन, खेळाडूंचा गौरवासह भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



पुण्यातील ऑलिम्पिक दिन मुख्य समारंभ स.प. महाविद्यालयात सकाळी १० वाजता रंगणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांच्या हस्ते ऑलिम्पियन, ध्यानचंद व अर्जुन पुरस्कार प्राप्त खेळाडूंना सन्मानित केले जाणार आहे. या कार्यक्रमास क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित रहाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटना (एमओए) महासचिव नामदेव शिरगावकर यांनी दिली.

# आयपीएल फायनलमध्ये व्ह्यूअरशीपचा नवा विक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीगच्या १८व्या हंगामात अनेक विक्रम प्रस्थापित झाल्याचे पाहायला मिळाले. यंदाच्या हंगामात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या रुपात आयपीएल स्पर्धेत नवा चॅम्पियन संघही मिळाला. आरसीबी संघाने अंतिम सामन्यात पंजाब किंग्जला पराभूत करत १७ वर्षांचा दुष्काळ संपवून पहिली वहिली ट्रॉफी जिंकली. हा सामना टी-२०मधील सर्वाधिक पाहिला गेलेला सामना ठरला आहे.



जिओहॉटस्टारने दिलेल्या माहितीनुसार अहमदाबाद येथील जगातील सर्वात मोठ्या स्टेडियमवर खेळवण्यात आलेला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यातील आयपीएल स्पर्धेतील अंतिम सामना हा टी-२० क्रिकेटच्या आतापर्यंतच्या इतिहासातील सर्वाधिक पाहिला गेलेला सामना ठरला. यंदाच्या हंगामात टेलिव्हिजन आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर एकूण ८४० अब्ज मिनटांपेक्षा अधिक वेळ चाहत्यांनी आयपीएल सामन्यांचा आनंद घेतल्याची नोंद झाली आहे.

अंतिम सामन्यातील वॉच टाइमचा आकडा हा ३१.७ अब्ज मिनिटे इतका आहे. टेलिव्हिजनवर अंतिम सामन्याला विक्रमी १६९ दशलक्ष प्रेक्षकांसह १५ अब्ज मिनिटे वॉच टाइमची नोंद झाली. डिजिटल प्लॅटफॉर्मवर अंतिम सामन्याला ८९२ दशलक्ष व्ह्यूज मिळाले, तर ५५ दशलक्ष पीक कॉन्करन्सी आणि १६.७४ अब्ज मिनिट वॉच टाइमसह यंदाच्या हंगामात आयपीएल स्पर्धेतील लोकप्रियता आणखी वाढल्याचे समोर येत आहे. मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या हंगामात डिजिटल प्लॅटफॉर्मवरील व्ह्यूअरशीपमध्ये २९ टक्के वाढ झाली आहे. स्टार स्पोर्ट्सने २५६ अब्ज मिनिटांचे कव्हरेज दिले.

भारत-पाक यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीमुळे स्पर्धात आठवडाभर स्थगित करण्यात आली होती. त्याआधी यंदाच्या हंगामातील पहिल्या आठवड्यात ४९.५ अब्ज मिनिट वॉच टाइमसह स्पर्धेच्या सुरुवातीला सर्वाधिक व्ह्यूअरशीपच्या नव्या विक्रमाची नोंद झाली होती. विराट कोहलीच्या संघाने १७ वर्षांनी मिळवलेल्या जेतेपदासह १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीमुळेही यंदाचा हंगाम खास ठरला.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com